सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑वर्ष - ३ रे ❑अंक - २५९ वा❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. १५ नोव्हेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु.❑पृष्ठ -६

## २०१५ ते २०२५.... संघ सक्रियतेनंतर बिहारमध्ये भाजपचा 'ग्राफ' वर

### संघासोबतच अभाविपचाही मोठा सहभाग : नवमतदारांसह २२ लाख तरुण मतदारांवर केले होते लक्ष केंद्रीत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५नागपूर**

बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपा व रालोआला घवघवीत यश मिळाले असून, महिला रोजगार योजनेला त्याचे श्रेय दिले जात आहे. मात्र, तळागाळातील मतदारांसोबतच नवमतदारांना मतदान केंद्रांपर्यंत खेचून आणण्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची मोठी भूमिका राहिली. संघाच्या 'शत – प्रतिशत' मतदानाच्या मोहिमेसोबतच अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांचाही यावेळी सक्रिय सहभाग दिसून आला. निवडणुकीच्या दृष्टीने मागील काही महिन्यांपासून तेथे या संघटनांनी नवमतदारांसह २२ लाख तरुण मतदारांवर लक्ष केंद्रीत केले होते.सन २०१५च्या निवडणुकीत भाजपला कमी मते मिळण्याचे खापर अनेकांनी संघावरच फोडले होते. मात्र, १० वर्षांतच भाजपच्या जागांचा ग्राफ प्रचंड वेगाने वर गेल्याचे वास्तव आहे.

सन २०१५मध्येबिहार निवडणुकीच्या अगोदर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या आरक्षणासंदर्भातील वक्तव्याचा विरोधकांनी मुद्दा केला होता. त्या निवडणुकीत संघाचे स्वयंसेवक मतदान मोहिमेतही सक्रिय नव्हते.



त्याचा फटका भाजपला बसला व एका वर्षाअगोदर देशात सत्तेवर येऊनही भाजपच्या ३८ जागांचे नुकसान सहन करत ५३ जागांवर समाधान मानावे लागले होते. मात्र, २०२० व २०२५ या दोन्ही निवडणुकीत संघ परिवारातील संघटना सक्रिय राहिल्या. त्याचा फायदा पक्षाला झाल्याचे दिसून आले.

**कुठे कॅम्पस ॲम्बेसेडर, तर कुठे यूथ क्लब**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतर्फे निवडणूक घोषित होण्याअगोदरच तयारीला सुरुवात करण्यात आली होती. २४३ जागांवर परिषदेच्या कार्यकर्त्यांनी हजारो बैठका घेतल्या. त्याचप्रमाणे कॅम्पस म्बेसेडर, यूथ क्लब इत्यादींच्या माध्यमातून नवमतदारांशी संपर्क साधण्यावर भर देण्यात आला. अगदी क्रीडा स्पर्धा, रथयात्रा, निबंध स्पर्धांच्या माध्यमातूनही तरुणाईशी संपर्क करण्यात आला.

**संघाच्या मतदानवाढीच्या आवाहनाला प्रतिसाद**

संघाकडून सर्वच मतदारसंघांत मतदानवाढीसाठी गृहसंपर्क मोहीम चालविण्यात आली होती. विरोधकांनी त्याला त्रिशूल मोहीम असेदेखील नाव दिले होते. यादरम्यान स्वयंसेवकांनी घरोघरी जात मतदारांशी संपर्क साधला होता व त्यांना भाजपचे नाव न घेता राष्ट्रीय विचारांच्या पक्षाला मतदान करण्याचे आवाहन केले होते. कुणालाही मतदान करा, मात्र मतदान करायला घराबाहेर निघा, असे प्रत्येक घरी स्वयंसेवक सांगत होते. २०१९मध्ये ५७.०७ टक्के मतदान झाले होते. मात्र, यंदा तो टक्का ६६.९१ टक्क्यांवर पोहोचला. भाजपचे लोकदेखील याचे श्रेय पटना येथील संघाच्या विजय निकेतन या कार्यालयात झालेल्या मतदान वाढीच्या नियोजन बैठकांना देत आहेत.

## ...तर काँग्रेसची अवस्था आणखी बिकट होऊ शकते, देवेंद्र फडणवीस यांनी लगावला टोला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५मुंबई**

लोकसभेला काँग्रेसने 'फेक नरेटिव्ह' तयार केला. पण, तो आता संपलाय हे काँग्रेसला कळले नाही. काँग्रेसने सत्य स्वीकारून आत्मपरीक्षण केले नाही, तर यापेक्षाही काँग्रेसची अवस्था वाईट होईल, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बिहारच्या निकालावर व्यक्त केली.



ते म्हणाले की, बिहार विधानसभा निवडणुकीत इतर सर्व मुद्दे बाजूला पडले. केवळ विकास आणि सुशासन हाच मुद्दा प्रमुख ठरला. बिहारच्या जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि नितीशकुमार यांच्यावर प्रेम आणि विश्वास दाखविला. हा मागचे रेकॉर्ड तोडणारा विजय आहे. बिहारच्या जनतेने पंतप्रधान मोदी आणि नितीशकुमार यांच्या सुशासनावर विश्वास ठेवून प्रचंड बहुमत दिले. पंतप्रधान मोदींवर बिहारचा जो विश्वास आणि प्रेम आहे, हे दिसून येते आहे.जनतेने विकासाला प्राधान्य दिले व महाराष्ट्राप्रमाणेच बिहारमधील लाडक्या बहिणींनी 'एनडीए'वर प्रेम दाखवत आम्हाला पूर्ण बहुमत दिले, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर, नितीशकुमार यांनी केलेल्या कामावर बिहारने शिक्कामोर्तब केले. त्यांचे आणि बिहारच्या लाडक्या बहिणींचे मी मनापासून अभिनंदन करतो. बिहारमध्ये महिलांच्या मतदानात वाढ झाली, त्यामुळेच 'एनडीए'ला मिळाला, असेही शिंदे म्हणाले.

## महाविकास आघाडीत फूट? मुंबई महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढवण्याची काँग्रेसची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५मुंबई**

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय घडामोडींना वेग आल्याच पाहायला मिळत आहे. यातच आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षांनी जोरदार मोर्चे बांधणी सुरू केली आहे. त्याच अनुषंगाने आज काँग्रेस पक्षाने एक मोठी घोषणा केली आहे.



मुंबई महापालिकेची निवडणूक काँग्रेस स्वबळावर लढवणार असल्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्निथला यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे. मुंबई महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढण्याच्या काँग्रेसच्या निर्णयामुळे महाविकास आघाडीतील पक्षांना धक्का बसल्याची चर्चा रंगली आहे. काँग्रेसच्या या निर्णयामुळे महाविकास आघाडीत फूट पडली आहे का? याबाबतही वेगवेगळ्या चर्चा रंगल्या आहेत.

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत काँग्रेस स्वबळावर लढणार आहे. २२७ जागांवर काँग्रेस पक्ष निवडणूक लढणार आहे. आमच्या पक्षाची जिल्हा काँग्रेस कमिटी, ब्लॉक काँग्रेस कमिटी आणि संपूर्ण पदाधिकाऱ्यांची हिच इच्छा आहे की आम्ही स्वबळावर निवडणूक लढवली पाहिजे. त्यामुळे आम्ही महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढणार आहोत, असं रमेश चेन्निथला यांनी म्हटलं आहे.

## अजित पवारांना न सांगताच राष्ट्रवादीनं लढवली बिहारची निवडणूक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५मुंबई**

बिहार विधानसभा निवडणुकीचे निकाल समोर आले आहेत. या निवडणुकीत भाजपा–जेडीयू यांच्या नेतृत्वात एनडीएने दमदार कामगिरी केली आहे. परंतु महाराष्ट्रात एनडीएचा घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही बिहारची निवडणूक स्वबळावर लढवली होती. अजित पवारांच्या राष्ट्रवादीने उभ्या केलेल्या या उमेदवारांना अत्यंत नगण्य मतदान झाले. सर्वच उमेदवारांचे डिपॉझिटही जप्त झाले. पक्षावर ओढावलेल्या या नामुष्कीबाबत पत्रकारांनी अजित पवारांना प्रश्न विचारला असता त्यांनी दिलेले उत्तर धक्कादायक होते. या उत्तरामुळे अजित पवारांना न सांगताच बिहारची निवडणूक राष्ट्रवादीने लढवली का असा प्रश्न निर्माण झाला आहे.

या निवडणुकीतील पक्षाच्या कामगिरीवर अजित पवार म्हणाले की, बिहार निवडणुकीत उमेदवार उभे करू नका असं मी सांगितले होते.



त्यानंतरच्या काळात आमच्या इथं वरिष्ठ पातळीवर प्रफुल पटेल यांनी काही निर्णय घेतले. मी तिथे जास्त लक्ष दिले नव्हते, मी महाराष्ट्रात होतो. त्यामुळे मला त्याबाबत अधिकची माहिती नाही असं विधान त्यांनी केले आहे. त्यामुळे पक्षाच्या चिन्हावर बिहार विधानसभा निवडणुकीत उमेदवार उभे करण्याच्या निर्णयापासून अजित पवारांनाच अंधारात ठेवले का अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. राष्ट्रवादीने बिहारमध्ये १६ जागांवर उमेदवार उभे केले होते.

अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने बिहार निवडणुकीत उमेदवार उभे केले होते. परंतु, यातील एकाही उमेदवाराला दखलपात्र कामगिरी करता आलेली नाही. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या सर्वच उमेदवारांचे डिपॉझिटही जप्त झाले. राष्ट्रवादीच्या अनेक उमेदवारांना ५०० मतेही मिळाली नाहीत. सासाराम विधानसभा मतदारसंघात आशुतोष सिंह यांना केवळ ११२ मते पडली. जिथे नोटालाही ३७० हून अधिक मते पडली आहेत. निवडणूक आयोगाच्या नियमानुसार, जर एखाद्या उमेदवाराला मतदारसंघातील एकूण मतांच्या १६ टक्के मते पडली नाही तर त्याचे डिपॉझिट जप्त होते.

## राज्यात नेमके बिबटे किती? वनविभागासाठी अचूक आकडेवारी सांगणे आव्हान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती**

राज्यातील वाघांचा नेमका आकडा सांगणाऱ्या वनविभागासाठीबिबट्यांची अचूक आकडेवारी सांगणे आव्हान ठरले आहे. सध्या पश्चिम महाराष्ट्रातबिबट्याने, तर विदर्भात वाघाने दहशत निर्माण केली आहे. त्यामुळे बिबटे नियंत्रणात कसे आणायचे, याबाबत वनविभागाचे अधिकारी पेचात पडले आहेत.




दरवर्षी वने व वनविभाग वाघ, बिबट्यांसह अन्य सहा वन्यजीवांची प्रगणना करतात आणि दर तीन वर्षांनी केंद्रीय पर्यावरण व वने आणि हवामान बदल मंत्रालय त्या आकडेवारीची माहिती जारी करत असते. राज्याने १९८० नंतर वाघ संरक्षणावर विशेष भर दिला. मार्गदर्शक तत्त्वे स्वीकारण्यात आली. वनकर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले गेले. मात्र, बिबट्याच्या बाबतीत वनविभाग अनभिज्ञ राहिला. बिबटे परिस्थितीशी सहज जुळून घेतात. मानवी अधिवासांत भटकून आलेले बिबटे आता रुळले आहेत. बिबटे मानवावर हल्ले करीत नाहीत, असा दावा वनविभाग करायचा. मात्र, आता बिबट्याचे मानवावरचे हल्ले वाढले आहेत. वनविभागाने बिबट्यांवर लक्ष न देता केवळ वाघ संवर्धनावर भर दिल्याने मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात बिबटे सशक्त झाले आहेत.

५००० बिबटे बिबट्यांच्या संख्येबाबत वन्यजीव विभागाकडे अद्याप अधिकृत आकडेवारी उपलब्ध नसली, तरी अंदाजानुसार पश्चिम महाराष्ट्रात सुमारे २ हजार बिबटे आहेत, तर नाशिक आणि विदर्भात किमान ३ हजार असे ५००० बिबट्यांची संख्या झाली आहे.

## तुम्ही चांगल्या योजना आणल्या नाहीत, जो जीता वहीं सिकंदर

### मुख्यमंत्री फडणवीसांचे शरद पवारांना उत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५मुंबई**

बिहार विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर विरोधकांनी केंद्रीय निवडणूक आयोग, भाजपावर जोरदार टीका केली आहे. महाराष्ट्रातील महाविकास आघाडीच्या नेत्यांनीही बिहार निवडणूक निकालावरून जोरदार हल्लाबोल केला. परंतु, ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी काँग्रेसच्या चुका दाखवायला मागे–पुढे पाहिले नाही. यावरून राजकीय वर्तुळात चर्चा सुरू असतानाच बिहार निवडणूक निकालावर ज्येष्ठ नेते शरद पवार यांची प्रतिक्रिया समोर आली. शरद पवारांनी केलेल्या टीकेला



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले.

मला एक शंका होती की, बिहारच्या महिलांनी इतक्या मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला याचा अर्थ आहे की दहा हजार रुपये देण्याची जी योजना आहे त्याचा हा परिणाम असावा. त्याचवेळी मतदान झाले होते. महाराष्ट्रात निवडणुकीच्या आधी पैसे वाटले. मताला पैसे येतात तसे नाही. अधिकृतपणे पैसे वाटले गेले. तसेच बिहारमध्ये झाले. पुढच्या निवडणुकीत ज्यांच्या हातात सत्ता आहे त्यांनी मतदानाच्या आधी अशा पद्धतीने पैशांचे वाटप करून निवडणुकीला सामोरे जायचे अशी भूमिका घेतली तर एकंदरीत निवडणूक पद्धतीबद्दल लोकांच्या विश्वासाला धक्का बसेल याची चिंता आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात पैशाचे वाटप करणे हे योग्य आहे का, याचा विचार निवडणूक आयोगाने केला पाहिजे. निवडणुका स्वच्छ आणि पारदर्शक पद्धतीने व्हाव्यात याच्यामध्ये दुमत असण्याचे कारण नाही. पण दहा दहा हजार रुपये ती लहान रक्कम नाही, असे शरद पवार यांनी म्हटले होते. पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शरद पवार यांनी केलेल्या टीकेवर प्रतिक्रिया विचारण्यात आली.

जो जीता वहीं सिकंदर, पराभव झाल्यानंतर तो स्वीकारता आला पाहिजे. मोकळ्या मनाने आपल्या चुका कबूल केल्या पाहिजेत. आत्मपरीक्षण केले पाहिजे. आत्मपरीक्षण करणे आमच्या विरोधी पक्षाला मान्य नाही. खऱ्या अर्थाने या ठिकाणी ज्या योजना आहेत, त्या करण्याची संधी सगळ्यांना होती. त्यांचे सरकार असताना त्यांनाही होती. त्यांनी केल्या नाहीत. आम्ही योजना केल्या, त्या लोकांना आवडल्या. लोकांनी आम्हाला मतदान केले. त्यावर लोकांना दोष देण्याचे कारण काय आहे, असा प्रतिप्रश्न देवेंद्र फडणवीस यांनी विचारला.

## अमरावतीत किन्नर महामंडलेश्वरांच्या बळजबरी धर्मांतराचा गंभीर प्रकार! संपूर्ण प्रकार अत्यंत धक्कादायक - खा.डॉ.अनिल बोंडे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५ अमरावती**

अमरावतीमध्ये एक अत्यंत धक्कादायक आणि गंभीर प्रकार समोर आला आहे. येथील किन्नर आखाड्याच्या महामंडलेश्वर श्री श्री माँ मातंगी नंदागिरी आणि त्यांच्या शिष्यांचे बळजबरीने मुस्लिम धर्मात धर्मांतरण करण्यात आल्याचा आरोप आहे. या पीडित तृतीयपंथीयांनी भाजप खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्याकडे तक्रार केली. त्यानंतर हा संपूर्ण प्रकार उघड झाला. त्यांनी या प्रकरणाच्या चौकशीची मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार असल्याचे स्पष्ट केले आहे.



**काय आहे नेमका प्रकार?**

अमरावती येथील रेणुका किन्नर बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा असलेल्या महामंडलेश्वर माँ मातंगी नंदागिरी आणि त्यांची शिष्या किंजल पाटील (वय २७) यांचे मुस्लिम धर्मात धर्मांतरण करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. ३ जुलै २०२५ रोजी अमरावतीतील साबणपुरा येथे राहणाऱ्या रफिक हाजी उर्फ सोनाबाई यांच्या माध्यमातून अचलपूर येथे हे बळजबरीचे धर्मांतरण घडवण्यात आल्याचा नंदागिरी यांचा आरोप आहे.

नंदागिरी यांनी दिलेल्या



माहितीनुसार, रफिक हाजी उर्फ सोनाबाई, परवीन जान आणि छोटू उर्फ ममता या लोकांनी त्यांचा 'ब्रेन वॉश' करून धर्मांतरासाठी प्रवृत्त केले. यानंतर, त्यांना अचलपूर येथे नेऊन एका डेऱ्यात मुस्लिम धर्मातील विधीनुसार बळजबरीने 'कलमा' वाचायला लावून धर्मांतरण करण्यात आले आणि त्रासही देण्यात आला.

इतकंच नाही, तर नंदागिरी यांच्या सहकारी शिष्या आम्रपाली चौधरी यांच्यावरही धर्मांतरणासाठी दबाव टाकण्यात आल्याचा धक्कादायक आरोप त्यांनी केला आहे.हा संपूर्ण प्रकार उघडकीस येण्यापूर्वीच, अमरावतीच्या निंभोरा भागात राहणाऱ्या २० तृतीयपंथीयांनी या संदर्भात ५ नोव्हेंबर २०२५ रोजी पोलिसांकडे लेखी तक्रार दाखल केली होती. मात्र, पोलिसांनी यावर कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे पोलिसांकडून या गंभीर प्रकरणात 'अक्षम्य दुर्लक्ष' झाल्याचा आरोप पीडितांनी केला आहे.

**महामंडलेश्वरांचे 'घरवापसी' आणि जीवाला धोका**

महामंडलेश्वरांचे 'घरवापसी' आणि जीवाला धोकाधर्मांतरामुळे होणारा त्रास वाढल्याने, माँ मातंगी नंदागिरी यांनी प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभमेळ्यामध्ये पुन्हा हिंदू धर्मात परतण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार प्रयागराज येथे त्यांचा 'पट्टाभिषेक' करण्यात आला.

पण, हिंदू धर्मात परतल्यानंतरही रफिक हाजी उर्फ सोनाबाई या व्यक्तीकडून त्यांना त्रास देणे सुरूच आहे. त्यामुळे आपल्या जीवाला धोका असल्याचे सांगत, नंदागिरी यांनी पोलिसांकडे संरक्षण देण्याची मागणी केली आहे.

## संपादकीय ......

# विश्वासाचा जनादेश

बिहारच्या निवडणूक निकालाने राष्ट्रीय राजकारणाची दिशा स्पष्ट करून टाकली. हा निकाल केवळ एका राज्याचा राजकीय निर्णय नाही; तर केंद्रातील सत्तेला अधिक बळ देणारा जनादेश आहे. नितीश-मोदी जोडी पुन्हा प्रभावी ठरली. यामुळे केवळ बिहारमध्येच नव्हे, तर दिल्लीतील राजकारणातही विरोधकांना मोठा धक्का बसला. 'इंडिया' आघाडीतील विसंवाद आता अधिक ठळकपणे समोर येईल. या पराभवाने विरोधकांच्या ऐक्यावर, रणनीतीवर आणि नेतृत्वावर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. रालोआच्या नेत्यांनी नितीशकुमार यांचा पक्ष तसेच त्यांच्या राजकीय बळाचा विजयासाठी उपयोग करून घेत जी मोट बांधली, त्याने सुरुवातीचे धूसर वातावरण स्पष्ट होत गेले. भाजपची स्पष्ट रणनीती, लांगुलचालनाच्या राजकारणाला छेद देत कल्याणाचा केलेला वादा, जागावाटपात नितीशकुमार यांना विश्वासात घेत साधलेला समतोल, पासवान यांच्या लोकजनशक्ती पक्षासोबतचा राजकीय समझोता कायम ठेवण्यात आलेले यश आणि यशापर्यंत नेऊन पोहोचवणार्या लोकप्रिय घोषणा या प्रमुख कारणांनी 'रालेआ'ने मोठ्या यशाने सत्ता राखली.

निवडणुकीत सर्वाधिक चर्चा झाली 'रेवडी' आणि 'एसआयआर'ची. फुकटच्या योजना, मोफत लाभ हा रेवडी या शब्दाचा राजकीय अर्थ. प्रचारात विरोधकांनी घोषणा आणि मोफत योजनांची अक्षरशः बरसात केली, पण लोकांना त्या पोकळ वाटल्या. त्याला ना आधार, ना विश्वास. याउलट सत्ताधारी पक्षाच्या 'रेवड्यां'वर मात्र लोकांनी भरभरून विश्वास ठेवला. मोफत योजना तेव्हाच प्रभावी ठरतात जेव्हा लोकांचा अनुभव त्याच्याशी जोडला जातो. 'रेवडीं'च्या चर्चेत जनतेने विश्वास निवडला. महिलांना सायकली, मुलींसाठी प्रोत्साहन, दारूबंदी आणि यंदा दिलेली १०,००० रुपयांची मदत, या सर्वांचा प्रभाव स्पष्ट दिसून आला.

या योजना म्हणजे निवडणूक प्रयोग असला तरी लाखो कुटुंबे त्याचा प्रत्यक्ष अनुभव आणि लाभ घेत आहेत, हे वास्तव नाकारता येणार नाही. हाच विश्वास एनडीएला प्रचंड मतांनी परत सत्तेत घेऊन आला. या लाटेत विरोधक पूर्णपणे वाहून गेले. विरोधकांच्या घोषणा भविष्यातील होत्या. त्यामुळे त्या अनिश्चित, कल्पित होत्या, तर सत्ताधारी पक्षाच्या योजना वर्तमानातील होत्या आणि जनतेने त्याचा आधीच अनुभव घेतला होता. हा मूलभूत फरक विरोधकांना कळला नाही. नितीशकुमारांचा प्रभाव निर्णायक ठरला. त्यांच्या प्रकृतीबद्दल अनेक चर्चा होत्या. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त जनता दलाला नुकसान होईल, असे म्हटले गेले, पण निकालांनी या सर्व अटकळी साफ चुकीच्या ठरवल्या. महिलांचा विश्वास पुन्हा नितीश यांच्यावर असल्याचे सिद्ध झाले. महिलांनी शांतपणे पण निर्णायक मतदान केले. हा विश्वास संयुक्त जनता दलासाठी (जेडीयू) संजीवनी ठरला. मोफत योजनांचे राजकारण अद्याप पूर्णतः गेलेले नाही, पण आता लोक 'विश्वासाचे राजकारण' निवडू लागले आहेत. मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रापासून ते बिहारपर्यंत याचा अनुभव अनेकदा आला आहे. 'एसआयआर'चा मुद्दा विरोधकांनी निवडणुकीतील घोटाळा म्हणून मांडला; परंतु जनतेने हा मुद्दा गांभीर्याने घेतला नाही. निवडणूक आयोगावर जनतेचा विश्वास कायम आहे. एसआयआरचा तांत्रिक परिणाम मात्र झाला.बनावट मतदार कमी झाले. लढत अधिक स्पष्ट झाली आणि 'एनडीए'ला या पारदर्शकतेचा लाभ मिळाला. सरकारने मतदारयादीला लावलेली चाळण सत्ताधार्यांच्या पथ्यावरच पडली. नावे वगळल्याची विरोधकांची ओरड फोल ठरली. लालूप्रसाद यांच्या नेतृत्वाखालील राजद आणि तेजस्वी यादव यांना सामाजिक आधार वाढवण्यात सपशेल अपयश आले. मागासवर्गाचा जो पाठिंबा एकेकाळी लालूप्रसाद यादव यांना मिळायचा तो यावेळी तेजस्वी यांना मिळाला नाही. 'जंगलराज'ची प्रतिमा अजूनही राजद पक्षासोबत जोडली जाते. तेजस्वी ती प्रतिमा बदलू शकले नाहीत. त्यांचा प्रभाव मर्यादित राहिला. यादव-मुस्लिम समीकरणाबाहेर ते विस्तार करू शकले नाहीत आणि विस्तार झाला नाही तिथे पराभव स्वाभाविकच होता. काँग्रेसची स्थिती विशेष चांगली नव्हती. राहुल गांधींचे आरोप जनतेवर परिणाम करू शकले नाहीत. जनता आता आरोप ऐकून मतदान करत नाही; ती काम पाहते. काँग्रेस सध्या त्या 'कामाच्या विश्वासापासून' दूर आहे. हा निकाल काँग्रेससाठीही कठोर संदेश आहे. राहुल गांधींनी याचा गंभीर विचार करायला हवा, असा इशाराच हा कौल देतो. निकालाचा राष्ट्रीय राजकारणावरही मोठा परिणाम होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला विजयाने दिलासा व बळ मिळाले.

विरोधक केंद्र सरकारला अस्थिर दाखवण्याचा प्रयत्न करत होते. नितीश कुमार, चंद्राबाबूंची जोड देत नवी समीकरणे मांडली जात होती, पण तसे काही घडणार नाही, हे स्पष्ट करत बिहारने तो मार्गच बंद केला. आता संसदेत सरकार अधिक आत्मविश्वासाने पावले टाकेल. या विजयाचा प्रभाव पूर्व भारतावरही पडेल. पश्चिम बंगालमध्ये तीन महिन्यांत निवडणुकांची शक्यता आहे. या निकालाने भाजपला नवी ऊर्जा दिली. बंगाल हे भाजपचे पुढचे लक्ष्य आहे. ममता बॅनर्जींसाठी हा निकाल धोक्याची घंटा मानावी लागेल. बिहारमधून आलेला हा जनादेश बंगालपासून ईशान्य भारतापर्यंतचे राजकारण बदलू शकतो. बिहारच्या राजकारणातील हा बदल खोल आहे. मतदार आता केवळ जात, धर्म किंवा भावनेवर वाहत जात नाही. जातीय राजकारण त्याने बाजूला ठेवले. तो राजकारण्यांना निरखून घेतो, विश्वास पाहतो. काम पाहतो. राजकारण जलद बदलत आहे. जनता परिपक्व होत आहे आणि आता ती राजकारणाची दिशा ठरवत आहे, हेच निकालाचे सार. 'रालोआ'ला विजयाचे आणि त्यासाठीच्या राजकारणाचे नेमके गणित सापडले आहे, असा निकालाचा दुसरा अर्थ. मध्य प्रदेश (२०२३), हरियाणा (२०२४), महाराष्ट्र (२०२४), दिल्ली (२०२५) आणि आता बिहार या पाठोपाठच्या निवडणूक विजयाने भाजपचा हा दावा सिद्ध केला आहे. आता सरकारसमोर आव्हान असेल ते या 'बिमारू' राज्याला गरिबी आणि दारिद्र्यातून बाहेर काढण्याचे. आता राष्ट्रीय राजकारणात या जनादेशाचे प्रभावी पडसाद दिसू शकतात.

## महाराष्ट्रातील खाजगी प्रसूती रुग्णालयांसाठी आरोग्य विभागाचा 'लक्ष्य-मान्यता' उपक्रम

# मातामृत्यू कमी करण्यासाठी आणि आदरयुक्त प्रसूती सेवांसाठी राज्य शासन व FOGSI यांचा संयुक्त प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५मुंबई,** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकाराने राज्यातील खाजगी प्रसूती रुग्णालयांमध्ये सेवा गुणवत्ता वाढवून प्रसूतीदरम्यान होणाऱ्या मातामृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने लक्ष्य-मान्यता (डरटीहूर-उशी-ींळषळलरींळेप) हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे.हा उपक्रम राज्यातील सर्व खाजगी रुग्णालयांमध्ये दर्जात्मक, सुरक्षित आणि आदरयुक्त प्रसूती सेवा (ठशीशिलींर्षीश्र चरींशीपळीं उरीश) सुनिश्चित करण्यासाठी राबविण्यात येत आहे. महाराष्ट्राने मागील काही वर्षांत मातामृत्यू कमी करण्यामध्ये उल्लेखनीय प्रगती केली असून, आता हा प्रयत्न खाजगी क्षेत्रापर्यंत विस्तारित करण्यात आला आहे.लक्ष्य-मान्यता कार्यक्रमाचा मुख्य हेतू म्हणजे प्रसूतीदरम्यान माता आणि नवजात बालकांचे मृत्यूदर कमी करणे, खाजगी रुग्णालयांमधील सेवा गुणवत्ता, रुग्ण सुरक्षा आणि रुग्ण काळजीत सुधारणा करणे, प्रत्येक महिलेला सुरक्षित व आदरयुक्त प्रसूती अनुभव मिळवून देणे.हा उपक्रम महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभाग, फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रिक अँड गायनॉकॉलॉजिकल सोसायटीज ऑफ इंडिया (ऋज्ञज्ञडख) आणि गहळिशसे या आंतरराष्ट्रीय आरोग्य संस्थेच्या सहकार्याने राबविण्यात येत आहे.गहळिशसे संस्थेमार्फत फॉग्सी आणि खाजगी रुग्णालयांना आवश्यक तांत्रिक सहाय्य, प्रशिक्षण आणि मूल्यांकन सहाय्य पुरविले जाणार आहे.या कार्यक्रमांतर्गत खाजगी प्रसूती रुग्णालयांना २६ मानकांवर आधारित प्रशिक्षण व मूल्यांकन दिले जाईल.ही मानके फॉग्सी आणि आरोग्य विभागाच्या तज्ञांच्या सहकार्याने तयार करण्यात आली असून, त्यामध्ये पुढील चार प्रमुख घटकांचा समावेश आहे -१. पायाभूत सुविधा आणि यंत्रणा मजबुतीकरण२. साधनांची उपलब्धता व वापर३. क्लिनिकल कौशल्ये आणि उपचार क्षमता४. नोंद व अहवाल प्रणाली (ठशलेीव ठर्शोिींळपस चशलहरपळीा)

यापैकी १६ मानके क्लिनिकल काळजीशी संबंधित असून, १० मानके आरोग्य संस्थात्मक व्यवस्थापनाशी निगडीत आहेत.खाजगी प्रसूती रुग्णालयांतील कर्मचाऱ्यांना सेवा गुणवत्ता, सुरक्षितता आणि काळजी याबाबत सविस्तर प्रशिक्षण दिले जाईल.या प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील स्किल लॅब, तउ रूम आणि प्रशिक्षण हॉल यांचा वापर करण्यात येईल. प्रशिक्षणादरम्यान लागू असलेले शासकीय शुल्क संबंधित संस्थांकडून अदा केले जाईल.प्रशिक्षण व कार्यक्रमासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे.मूल्यांकनासाठी राज्यस्तरीय मूल्यांकनकर्ता उपलब्ध करून देणे. जिल्हा स्तरावर फॉग्सी सोसायटीसोबत नियमित आढावा बैठकांचे आयोजन करणे. याची जबाबदारी जिल्हा शल्य चिकित्सक यांची असेल. राज्यातील खाजगी प्रसूती रुग्णालयांमध्ये दर्जात्मक व सुरक्षित प्रसूती सेवा उपलब्ध होतील. महिलांना प्रसूतीदरम्यान आदरयुक्त व सन्मानपूर्वक देखभाल मिळेल. आरोग्यसेवेतील विश्वास, पारदर्शकता आणि गुणवत्ता वाढेल. मातामृत्यू व बालमृत्यू दरात घट होऊन महाराष्ट्रातील आरोग्य निर्देशांकात सकारात्मक बदल घडेल.

लक्ष्य-मान्यता हा उपक्रम महाराष्ट्राच्या आरोग्य क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात असून, सार्वजनिक व खाजगी क्षेत्राचा संयुक्त सहभाग हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य आहे. या उपक्रमामुळे राज्यातील खाजगी रुग्णालयांमध्ये सेवेचा दर्जा आणि मातृत्व आरोग्याचे परिणाम दोन्ही सुधारतील, असा विश्वास आरोग्य विभागाने व्यक्त केला आहे.




# जाणून घ्या, वजन कमी करण्यासाठी पेरूचा 'सीक्रेट फॉर्म्युला'!

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक**

वजन कमी करण्यासाठी लोक अनेक उपाय करतात जिम, डायट, फॅन्सी सुपरफुड्स, प्रोटीन शेक्स, पण आपल्या घरात अगदी सहज मिळणारा, साधा आणि स्वस्त असा एक फळ वजन कमी करण्यासाठी किती प्रभावी आहे हे अनेकांना माहीतच नसतं. हे फळ म्हणजे पेरू. होय, हा साधा हिरवा पेरू तुमचं वजन कमी करण्याचा 'सीक्रेट फॉर्म्युला' ठरू शकतो.पेरूमध्ये व्हिटॅमिन उ, भरपूर फायबर, अँटिऑक्सिडंट्स आणि शरीराला आवश्यक असणारी अनेक सूक्ष्म पोषणद्रव्यं असतात. विशेष म्हणजे, सकाळी रिकाम्या पोटी अमरूद खाल्ल्यास वजन कमी होण्याची प्रक्रिया अधिक वेगाने आणि नैसर्गिकरीत्या सुरू होते. अनेक फिटनेस एक्स्पर्ट्स आणि डायटिशियन पेरूला 'सुपर स्लिमिंग फूड' मानतात. त्याचं कारणही तितकंच दमदार आहे. कमी कॅलरी, जास्त फायबर आणि पोट भरून राहणारी क्षमता. सकाळी रिकाम्या पोटी पेरू खाल्ल्यानं पचनाला गती मिळते. रात्रीचा घेतलेला अन्नाचा अवशेष योग्य प्रकारे साफ होतो आणि आतड्यांची हालचाल सुधारते. फायबर जास्त असल्यामुळे पोट जास्त वेळ भरल्यासारखं वाटतं, त्यामुळे दिवसभर अनावश्यक भूक लागत नाही आणि ओव्हरईटिंगवर नियंत्रण राहतं. हेच वजन कमी करण्यातील सर्वात मोठं पाऊल आहे. पेरू इन्सुलिन लेव्हलला स्थिर ठेवतो. विशेष म्हणजे ज्या लोकांना ब्लड शुगर कंट्रोल ठेवण्यात अडचणी येतात, त्यांच्यासाठी अमरूद अत्यंत उपयुक्त आहे.



सकाळी पेरू खाल्ल्यास रक्तातील साखर वाढत नाही आणि शरीरातील ऊर्जेचं प्रमाण संतुलित राहतं. त्यामुळे थकवा येत नाही आणि दिवसभरातील कार्यक्षमता टिकून राहते. पेरूमध्ये असणारे अँटिऑक्सिडंट्स शरीरातील दाह कमी करतात. शरीरात सूज किंवा इन्फ्लेमेशन असेल तर वजन कमी होत नाही. हा अनेकांना न समजणारा मुद्दा आहे. पेरू नियमित खाल्ल्यास शरीरातील विषारी घटक बाहेर पडतात आणि मेटाबोलिझम (चयापचय) वेगानं काम करतं. मेटाबोलिझम वाढला की शरीर जास्त कॅलरी जाळतं आणि चरबी कमी होऊ लागते.पेरूचं आणखी एक खास वैशिष्ट्य म्हणजे त्यात असणारा व्हिटॅमिन उ चा भरपूर पुरवठा. व्हिटॅमिन उ हे इम्युनिटी वाढवण्यासाठी खूप महत्त्वाचं. वजन कमी करताना शरीर कमकुवत होऊ नये म्हणून रोगप्रतिकारशक्ती मजबूत ठेवणं महत्त्वाचं आहे. पेरू एकाचवेळेस स्लिमिंग आणि इम्युनिटी बूस्टिंग दोन्ही फायदे देतो.

# एकाचवेळी अनेक पिकं घ्या, चांगला नफा मिळवा, आंतरपीक पद्धतीकडे वाढता कल

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक**

आजकाल शेतकरी शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञान आणि पद्धती वापरण्यास सुरुवात करत आहेत. हळूहळू शेतकरी या आधुनिक युगाशी जुळवून घेत आहेत आणि शेतीमध्ये नवीन बदल करत आहेत. आंतरपीक म्हणजे एकाच शेतात एकाच वेळी दोन किंवा अधिक पिके घेण्याची पद्धत. ही पारंपारिक शेतीपेक्षा वेगळी आणि अधिक फायदेशीर पद्धत आहे. या तंत्राचा अवलंब करून, शेतकरी एकाच वेळी अनेक पिके घेत असून चांगला नफा मिळवत आहेत.

**आंतरपीक कसे घेतले जाते?**

पिकांची योग्य निवड : अशी पिके निवडा ज्यांची मुळे वेगवेगळ्या खोलीपर्यंत पोहोचतात आणि एकमेकांना पोषक तत्वे पुरवतात, जसे की खोलवर मुळे असलेले पीक (उदा. मका) आणि उथळ मुळे असलेले पीक (उदा. मूग), किंवा कडधान्य आणि धान्य पीक.

**योग्य व्यवस्था :** पिके एका विशिष्ट नमुन्यात पेरली जातात. हे वेगवेगळ्या ओळींमध्ये, मिश्र ओळींमध्ये किंवा पट्ट्यांमध्ये असू शकते.

**एकाच वेळी पेरणी :** दोन्ही पिके एकाच वेळी पेरली जातात, किंवा एकाची दुसरी स्थापना झाल्यानंतर पेरली जाते.

**योग्य अंतर :** दोन्ही पिकांमध्ये योग्य अंतर ठेवले आहे जेणेकरून ते एकमेकांचा सूर्यप्रकाश आणि पोषक तत्वे सामायिक करतील.




आंतरपीकांची काही उदाहरणे

मका आणि राजमा, ऊस आणि मोहरी, हरभरा आणि गहू

वाटाणे आणि शेंगदाणे

भात आणि मत्स्यपालन

आंतरपीकांचे ५ फायदे

**वाढलेले उत्पन्न :** एकाच शेतातून दोन पिके घेतल्याने शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळते. उदाहरणार्थ, मुख्य पीक (जसे की निलगिरी) येईपर्यंत, तुम्ही मक्यासारख्या आंतरपीकातून नफा मिळवू शकता.

**जोखीम कमी करणे :** जर एक पीक अपयशी ठरले तर दुसरे पीक नुकसान भरून काढते. यामुळे शेतकऱ्याचा एकूण धोका कमी होतो.

**सुधारित मातीची सुपीकता :** वेगवेगळ्या मुळांच्या पिकांची लागवड केल्याने मातीचा निचरा सुधारतो आणि शेंगा पिकवल्याने जमिनीत नायट्रोजन वाढते.

नैसर्गिक कीटक आणि रोग नियंत्रण : आंतरपीक नैसर्गिक कीटक नियंत्रण वाढवू शकते. भोपळा सारखी काही पिके कीटकांना दूर ठेवण्यास मदत करू शकतात.

**खर्च कमी करणे :** आंतरपीक घेतल्याने, शेतकरी एकदाच शेत तयार करतात, एकदाच सिंचन करतात आणि एकदाच खत देतात, ज्यामुळे खर्च कमी होतो. तसेच, जेव्हा दोन पिके एकत्र बाजारात विकली जातात तेव्हा उत्पन्न वाढते.

# आरोग्य विभागाने माहेरघर योजना कार्यरत आरोग्य सेविकांचा पुढाकार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५ अमरावती,**

प्राथमिक आरोग्य केंद्र टेंभूरसोंडा येथे राबविण्यात येत असलेल्या माहेरघर योजना तसेच जे.एस.एस.के. (जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम) योजनेअंतर्गत प्रसूतीपूर्व आणि प्रसूतीपश्चात मातांना आहार पुरविण्यात येतो.

टेंभूरसोंडा येथील मूळ माहेरघर नादुरुस्त असल्यामुळे, पर्यायी व्यवस्था म्हणून प्रसूतीपूर्व व प्रसूतीपश्चात मातांना प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वॉर्डातच भरती केले जात आहे. भरती झालेल्या मातांना श्री विशाल गावंडे, वैदेही भोजनालय, टेंभूरसोंडा यांच्यामार्फत दोन वेळचे जेवण पुरवले जात होते. परंतु, संबंधित पुरवठाधारक यांच्या पत्नीची प्रकृती ठीक नसल्यामुळे माहे ऑक्टोबरपासून जेवणाचा पुरवठा होऊ शकला नाही. या कारणामुळे श्री वायकर भोजनालय, टेंभूरसोंडा यांच्याकडे तात्पुरती व्यवस्था सोपवण्यात आली होती, परंतु त्यांच्याकडूनही भरती झालेल्या मातांना जेवणाचा पुरवठा करण्यात आला नाही. जेवण पुरवठा खंडित झाला असताना, आरोग्य सेविका यांनी स्वतः पुढाकार घेऊन प्रसूतीपूर्व व प्रसूतीपश्चात मातांसाठी जेवणाची व्यवस्था केली होती. आरोग्य विभागाने आता जेवण पुरवठा नियमित चालू केला आहे.तसेच, भविष्यात जेवणात खंड पडू नये म्हणून पुरवठा आदेश धारकांना ताकीदही देण्यात आली आहे. आरोग्य विभागाने माहेरघर योजना कार्यरत असल्याचे स्पष्ट केले असून, केवळ पुरवठाधारकांच्या वैयक्तिक अडचणीमुळे तात्पुरता खंड पडला होता, असे नमूद केले आहे.-

# जलजन्य आजार नियंत्रणात: अमरावती जिल्ह्याचा 'शून्य उद्रेक' उद्देश यशस्वीपणे साध्य

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती,**

अमरावती जिल्ह्याने सन २०२५ मध्ये जलजन्य आजारांवर नियंत्रण मिळवत 'शून्य उद्रेक' चा महत्त्वाकांक्षी उद्देश यशस्वीपणे साध्य केला आहे. सन २०२० मध्ये याच जिल्ह्यात, विशेषतः मेळघाट क्षेत्रात, ५२१ रुग्ण बाधित आणि काही मृत्यूंसह जलजन्य आजारांचा मोठा उद्रेक झाला होता. या पार्श्वभूमीवर, जिल्हा प्रशासनाने आगामी काळात अशा आपत्ती टाळण्यासाठी. मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वयित आरोग्य कृती आराखडा तयार केला.या आराखड्यानुसार, १ एप्रिल ते ३० एप्रिल २०२५ पर्यंत जिल्ह्यातील ८३६ ग्रामपंचायतींमध्ये पाणी गुणवत्ता व स्वच्छता सर्वेक्षण मोहीम राबविण्यात आली, ज्यात ६०० हून अधिक ग्रामपंचायतींना 'हिरवे कार्ड' देण्यात आले. जिल्हा स्तरावर साथरोग नियंत्रण कक्ष स्थापन करून प्रत्येक तालुक्याच्या साथरोग स्थितीचा मागोवा २४ तास दूरध्वनीद्वारे घेण्यात आला. तसेच, जिल्हा व तालुका स्तरावर त्वरित प्रतिसाद पथके आणि ७ नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली, ज्यांना दोन-दोन तालुक्यांच्या देखरेखीची जबाबदारी दिली गेली. मेळघाटासाठी 'एक दिवस मेळघाटकरिता' उपक्रम राबवून स्थानिक समस्या त्वरित निवारण करण्याचे आदेश देण्यात आले. पूर आणि अतिवृष्टीमुळे संपर्क तुटणाऱ्या १६ गावांमध्ये एक महिना पुरेल इतका औषधांचा साठा ठेवण्यात आला. त्याचबरोबर, या भागातील गरोदर माता आणि बालकांच्या आरोग्यावर लक्ष केंद्रित करून २४ तास पर्यायी आरोग्य सेवा पुरविण्यात आली. 'स्टॉप डायरिया कॅम्पेन' आणि व्यापक आरोग्य जनजागृती कार्यक्रमांमुळे नागरिकांमध्ये सुरक्षित पाणी पिणे आणि स्वच्छतेचे महत्त्व रुजविण्यात यश आले. या सर्व समन्वित प्रयत्नांमुळे २०२५ मध्ये जिल्ह्यात पाण्यातून पसरणाऱ्या आजारांचा एकही उद्रेक झाला नाही, ज्यामुळे जिल्ह्याच्या आरोग्य व्यवस्थापनाची कार्यक्षमता सिद्ध झाली आहे, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दिली.-

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

शनिवार दि. १५ नोव्हेंबर २०२५ शहर/ग्रामिण


# भाऊसाहेब देशमुख जयंती उत्सवा निमित्त विनामूल्य जयपुर फुट वितरणाचा विक्रमी कार्यक्रम

## डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय,इंडियन रेड क्रॉस सोसायटी, आर्किटेक रामेश्वर मणियार,अंबादास खोब्रागडे आर्ट फाउंडेशन यांचा संयुक्त उपक्रम

### श्री शिवाजी शिक्षण संस्थेत पहिल्यांदाच होणार कृत्रिम अवयव वाटप



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५ अमरावती,**-श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या विशेष पुढाकारातून उमेद पंख विश्वासाचे या सामाजिक उद्देशाने अमरावती जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांसाठी मोफत जयपूर फुट वितरणाचा भव्य उपक्रम १८ डिसेंबर ते २७ डिसेंबर २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात येत आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्थेत पहिल्यांदाच कृत्रिम अवयव वाटपाचा कार्यक्रम होत आहे. या संधीचा गरजूंनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

या उपक्रमाची अधिक माहिती माहिती देताना.. दिलीप बाबू इंगोले आणि आणि हेमंत काळमेघ यांनी सांगितले की, लाभार्थ्यांना कृत्रिम अवयव (जयपूर फुट) पूर्णपणे मोफत देण्यात येणार असून हा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर पार पडणार आहे.भारताचे पहिले कृषिमंत्री तसेच श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी स्व. भाऊसाहेब उपाख्य पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यांचे आदर्श लक्षात घेऊन समाजातील दुर्बल घटकांना आत्मनिर्भरतेचा हात देण्याचा हा प्रयत्न आहे.हा उपक्रम डॉ. पंजाबराव देशमुख मेमोरियल मेडिकल कॉलेज,अमरावती, इंडियन रेड क्रॉस सोसायटी (अकोला), जयपूर फुट उपक्रमाचे प्रणेते आर्किटेक्ट रामेश्वर मणियार (पुणे) आणि दि अंबादास खोब्रागडे आर्ट फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे.श्री शिवाजी शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकारी परिषदेने या आयोजनाची जबाबदारी स्वीकारली आहे.अमरावती जिल्ह्यातील १४ तालुक्यांमधून सुमारे ६०० हून अधिक दिव्यांग लाभार्थ्यांनी या प्रकल्पासाठी नोंदणी केली आहे.

या कार्यक्रमासाठी पालकमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांचे कार्यालय तसेच विशेष कार्य अधिकारी योगेशजी कोठेकर यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे. यासोबतच जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले व अमरावती महानगरपालिका आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांच्या सक्रिय सहभागामुळे जिल्ह्याच्या विविध भागांतून संस्था आणि स्वयंसेवी संघटना या प्रकल्पात सहभागी होत आहेत.

या निमित्ताने आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कलाकार सौ. रजनी अंबावे यांच्या सुप्रसिद्ध कलाकृतींचे विशेष प्रदर्शनही आयोजित करण्यात येणार आहे. या कलाकृतींच्या विक्रीतून मिळणारा निधी जयपूर फुट वितरण उपक्रमासाठी वापरला जाणार आहे. तसेच, रेड क्रॉस सोसायटीचे चेअरमन डॉ. किशोर मालोकार यांच्या मार्गदर्शनाखाली रेड क्रॉसचे सदस्यही या कार्यात सक्रिय सहभाग नोंदवत आहेत.

हा उपक्रम दिव्यांग बांधवांसाठी उमेद पंख विश्वासाचे ठरावा, अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे.अधिक माहिती साठी अक्षय पाथ्रीकर (माऊली) मोबाईल नंबर.८८८८९०७२४२, प्रकाश गवळी ९८८१७४३४०७ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.पत्रकार परिषदेला..पत्रकार परिषदेला श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीप बाबू इंगोले, कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ,अधिष्ठाता डॉ ए.टी.देशमुख, डॉ.सुरेश आसोले, प्राचार्य डॉ. किशोर मालोकार, रामेश्वर मणियार,संदीप पुंडकर, रजनी अंबादे , आकाश अंबादे, प्रभुजितसिंह बछेर,यांची उपस्थिती होती.

# नांदगाव पेठ जि.प. सर्कलमध्ये काँग्रेसची महिलाशक्ती सज्ज

## यशोमती ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली मोर्चेबांधणी



सुनंदा केचे विभा देशमुख ज्योती ठाकरे जिल्लेश्वरी ठाकरे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५नांदगाव पेठ**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बिगुल वाजताच नांदगाव पेठ जिल्हा परिषद सर्कलमध्ये काँग्रेसने देखील जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. तिवसा विधानसभा मतदारसंघाच्या माजी आमदार तथा विदर्भाच्या फायरब्रँड नेत्या यशोमती ठाकूर स्वतः या निवडणुकीकडे विशेष लक्ष ठेवून आहेत. काँग्रेसला नवसंजीवनी देण्याचा निर्धार करत त्यांनी पक्षयंत्रणा सज्ज केली असून या सर्कलमध्ये तोलामोलाचा उमेदवार देऊन भाजपला शह देण्याची तयारी काँग्रेसने पूर्ण केली आहे.या मतदारसंघात सर्वसाधारण महिला आरक्षण असल्याने चार महिला दावेदारांनी जोरदार तयारी केली असून, शेवटी कोणाला पक्षाचे अधिकृत तिकीट मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


अनेकांच्या पदरी निराशा आणि एका उमेदवाराला संधी अशी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे.त्यातही काँग्रेसच्या आघाडीवरील नाव म्हणजे माजी पंचायत समिती सदस्या सुनंदा केचे. त्यांनी नांदगाव पेठ परिसरात दीर्घकाळ जनसंपर्काचे मजबूत जाळे निर्माण केले आहे. स्थानिक स्तरावर महिलांसोबत काम, सामाजिक बांधिलकी आणि प्रत्येक गावाशी असलेले सलोख्याचे संबंध ही त्यांची जमेची बाजू मानली जाते. मागील कार्यकाळात विविध विकासकामांत त्यांनी पुढाकार घेतला होता. त्यांचा शांत पण परिणामकारक स्वभाव आणि सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची वृत्ती यामुळे त्या पक्षांतर्गत आणि जनतेत लोकप्रिय आहेत. याशिवाय माहुली जहागीरच्या माजी सरपंचा आणि काँग्रेस कमिटीच्या पदाधिकारी ज्योती ठाकरे यांचीही दावेदारी तितकीच प्रबळ आहे. त्या अनेक वर्षांपासून राजकारणात सक्रिय असून यशोमती ठाकूर यांच्या विश्वासू म्हणून त्यांची ओळख आहे.नांदगाव पेठ येथील माजी पंचायत समितीचे उप सभापती बाळासाहेब देशमुख हे नांदगाव पेठ मधील राजकारणाचा केंद्रबिंदू आहेत. अश्यातच त्यांच्या पत्नी माजी सरपंच व विद्यमान सदस्यविभा देशमुख यांच्या नावाची देखील जोरदार चर्चा असून नेत्यांनी संधी दिल्यास आपण राजकीय रणांगणात बाजी मारू असा विश्वास देशमुख दाम्पत्याने व्यक्त केला. डिगरगव्हाण येथील विद्यमान सरपंच जिल्लेश्वरी ठाकरे ह्यांनी आपल्या कार्यकाळात गावोगावी विकासाची छाप पाडली आहे. डॉ. शंकरराव ठाकरे यांचा काँग्रेसशी असलेला जुना निष्ठावान संबंध आणि जनसंपर्कही त्यांच्या बाजूने वजन वाढवतो.या सर्व पार्श्वभूमीवर, यावेळी नांदगाव पेठ सर्कलची निवडणूक काँग्रेससाठी प्रतिष्ठेची ठरणार आहे.ज्यांच्या नावाची चर्चा त्यांनाच उमेदवारी मिळणार की वेळेवर पक्षश्रेष्ठी आणखी कोणाला संधी देतात तसेच नाराज कार्यकर्त्यांना एकत्र ठेवत कोणते सामाजिक-राजकीय समीकरण साधतात, यावर काँग्रेसचा विजय किंवा पराभव अवलंबून असणार आहे.

# महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या बोटिंग रेस ने कौंडण्यपूरच्या अंबा रुख्मिणी महोत्सव २०२५ ची सुरुवात

## एक लक्ष दीपोत्सवाने उजळले श्री रुख्मिणीचे माहेरघर







**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५ अमरावती**

महोत्सव विदर्भाचा, विदर्भाच्या पुरातन राजधानीचा नामक अंबा रुक्मिणी महोत्सव २०२५ मध्ये कौडण्यपूर येथे नयनरम्य बोटिंग शो म्हणजेच नौका स्पर्धेचे विहंगमय दृश्य कौडण्यपूर च्या वर्धा नदीपात्रात दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ रोजी पाहायला मिळाले. फटाक्यांची आतिषबाजी, हजारोंची गर्दी ही या महोत्सवाचे विशेष आकर्षण ठरले. विशेष म्हणजे महाराष्ट्रात प्रथमच असा अनोखाउपक्रम आयोजित करण्यात आला असून या बोटिंग स्पर्धेला संपूर्ण महाराष्ट्रातून उस्फुर्त प्रतिसाद मिळाला असून बोट चालकांनी अत्यंत उत्साहाने या स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन नयनरम्य सादरीकरण केले. अंबा रुख्मिणी सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने आयोजित या बोटिंग स्पर्धेला अंबा रुक्मिणी महोत्सव २०२५ चे उदघाटन रविराज देशमुख (अध्यक्ष, अंबा रुख्मिणी सांस्कृतिक महोत्सव समिती), तर अध्यक्षस्थानी जगद्गुरू स्वामी श्री रामराजेश्वराचार्यजी माऊली सरकार तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून श्री अंबिका देवी संस्थानचे पुजारी श्री नरेंद्र महाराज पुरी, सौ. गायत्रीताई देशमुख, तसेच सरपंच प्रेमदास राठोड, कुऱ्हा च्या सरपंच सौ. मीनाताई नायर यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी रविराज देशमुख व सौ. गायत्री देशमुख यांच्याहस्ते वरदायिनी मातेची आरती करण्यात आली. यावेळी वरदायिनी आरतीचे नयनरम्य दृश्य बघण्यासाठी हजारो नागरिकांनी गर्दी केली होती. या दिमाखदार सोहळ्याचे प्रास्ताविक अंबा रुख्मिणी सांस्कृतिक महोत्सव समितीचे सचिव अक्षय पुंडेकर यांनी केले. तर संचालन सौ. अश्विनी विलायतकर आणि आभार प्रदर्शन सुमित तट्टे यांनी केले.

## निवडणूक आचारसंहितेमुळे जिल्हा लोकशाही दिन रद्द

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती,**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका-२०२५ निमित्त लागू असलेल्या आदर्श आचारसंहितेमुळे जिल्हाधिकारी कार्यालयात होणारा जिल्हा लोकशाही दिन साजरा केला जाणार नाही.राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या आदेशानुसार, दि. ३ डिसेंबर २०२५ पर्यंत आचारसंहिता लागू असल्याने, हा निर्णय

# अतिक्रमणांवर हातोडा! रस्त्यांचा श्वास मोकळा; महापालिकेची धडक मोहीम



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५ अमरावती** -शहरात अतिक्रमणांची समस्या अतिशय गंभीर झाली आहे. रस्त्याच्या कडेला किंवा जागा दिसेल तिथे अतिक्रमणे केली जातात. काही तर पक्के शेड ठोकून अतिक्रमणे करतात. या अतिक्रमणांमुळेच शहरात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. आताही महानगरपालिका प्रशासनाने पुन्हा एकदा या अतिक्रमणांना रडारवर घेतलं आहे. शहरात अतिक्रमण हटाव मोहीम सुरू झाली आहे. पाहता पाहता अतिक्रमणे जमीनदोस्त होऊ लागली आहेत. काही जणांनी स्वतःहून अतिक्रमणे काढून घेण्यास सुरुवात केली आहे.माननीय. आयुक्त, यांच्या आदेशान्वये महानगरपालिकेच्यावतीने अतिक्रमण मोहिम सुरू असून आज दिनांक १४ नोव्हेंबर,२०२५ रोजी जेसीपी व चार ट्रक द्वारे जमील कॉलनी मुख्य रस्ता ते ताज नगर पुलापर्यंत वलगाव रोड, येथील असलेले फुटपाथ वरील लोखंडी शेड, काँक्रीट ओटे, अवैध लोखंडी खोके, बल्लीबासे लावून टिनाचे झोपड्या असलेले, सदर अतिक्रमण काढण्याची कार्यवाही महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी अतिक्रमण काढण्यास सुरुवात केली. जोपर्यंत शहरातील रस्ते व फूटपाथ मोकळे होणार नाही तोपर्यंत ही अतिक्रमणाची कारवाई सुरू राहील. ज्यांनी अतिक्रमण केलं असेल त्या सर्वांनी अतिक्रमण स्वतःहून काढून घ्यावे अन्यथा महानगरपालिका प्रशासन काढून घेईल. तसेच कायदेशीर कारवाईलाही सामोरे जावे लागेल असा इशारा अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त, यांनी दिल्या. या इशाऱ्याने अतिक्रमण धारकांचे धाबे दणाणले आहे.शहरातील मुख्य बाजारपेठ कापड बाजारातील अतिक्रमणांवर देखील लवकरच कारवाई करणार असून त्याबाबत शहरातील इतर भागातील अतिक्रमणे मोकळे करून मुख्य शहरातील अतिक्रमणांवर कारवाई करणार असे महानगरपालिकेचे अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त,यांनी सांगितले.

# 'आता तरी इव्हीएमवर रडणे सोडा!' नवनीत राणा यांचा काँग्रेस, शिवसेनेला टोला



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५ अमरावती :** बिहार विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी 'एनडीए'ला बहुमत मिळताना दिसत आहे. त्यावर भाजप आणि विरोधी पक्षांकडूनही प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसत आहेत. त्यातच भाजपच्या नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी बिहारच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला बिहारच्या जनतेने नाकारल्याबद्दल चांगलाच टोला लगावला आहे.

नवनीत राणा म्हणाल्या, बिहारच्या लोकांनी एनडीएच्या बाजूने त्सुनामीसारखा निकाल दिला आहे.

भाजपच्या कार्यकर्त्यांच्या निष्ठेचे, परिश्रमाचे हे फळ आहे. देश प्रेमाचे हे द्योतक आहे. बिहारच्या जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि आजच्या युगातील चाणक्य अमित शहा यांच्यावर दृढ विश्वास व्यक्त केला आहे.

पण, याचवेळी काँग्रेस आणि शिवसेना उद्धव ठाकरे गटाने या निकालापासून आता तरी धडा घ्यायला हवा.

केवळ ईव्हीएमवर बोलून चालणार नाही. प्रत्यक्ष मैदानावर लोकांसाठी त्यांना काम करावे लागणार आहे. ईव्हीएमच्या नावावर मोर्चे काढणे आता तरी थांबवा, माझा काँग्रेसच्या नेत्यांना आणि शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांना सल्ला आहे, की आता तरी सुधारा. ईव्हीएमवर रडणे बंद करा. आता तरी त्यांनी ईव्हीएमचा ड्रामा बंद केला पाहिजे. केवळ आरोप करून चालणार नाही.

लोकांना कोण आपले आहेत आणि कोण परके आहेत, हे चांगले कळते, असा टोला त्यांनी लगावला.युवा स्वाभिमान पक्षाचे अध्यक्ष आमदार रवी राणा यांनी देखील उद्धव ठाकरे यांना टोला लगावला आहे.

उद्धव ठाकरे हे काँग्रेसच्या विचारांवर चालत आहेत. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृह मंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शिवसेना प्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांना पुढे नेण्याचे काम करीत आहेत. केवळ ईव्हीएमवर आरडाओरड करून चालणार नाही. शरद पवार, उद्धव ठाकरे, राज ठाकरे यांनी ईव्हीएमविषयी आरोप करून रान पेटवण्याचा प्रयत्न केला, पण हा निकाल म्हणजे बिहारच्या जनतेने दिलेली चपराक आहे, असे रवी राणा म्हणाले.

बिहारच्या निवडणुकीत काँग्रेस कुठेही शिल्लक राहिलेली नाही. आपल्या देशाचा पप्पू राहुल गांधी आणि महाराष्ट्राचा पप्पू आदित्य ठाकरे आहे, हेही आता स्पष्ट झाले आहे, अशी टीका रवी राणा यांनी केली. रवी राणा म्हणाले, बिहारचा निकाल म्हणजे लोकशाहीचा विजय आहे. बिहारच्या जनतेने पुन्हा एकदा एनडीएला पसंती दिली आहे. जनतेसाठी आधी काम करावे लागते, तेव्हा जनतेचे प्रेम मिळत असते. केवळ आरोप करून चालत नाही, असेही रवी राणा म्हणाले.

## अमरावती महानगरपालिकेच्या छायाचित्र स्पर्धा २०२५ अंतर्गत

# विजेत्यांना आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या हस्ते पारितोषिक वितरण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १५अमरावती**

अमरावती महानगर पालिके तर्फे दिनांक २ सप्टेंबर २०२५ ते ५ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या छायाचित्र स्पर्धा २०२५ चा निकाल जाहीर झाल्यानंतर आज, १४ नोव्हेंबर २०२५ रोजी, महानगरपालिका कॉन्फरन्स हॉल येथे पार पडलेल्या कार्यक्रमात विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. या पुरस्कार वितरण समारंभाचे अध्यक्षस्थान अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी भूषविले.

स्पर्धेतील छायाचित्रांचे परीक्षण सुप्रसिद्ध परीक्षक मंडळी श्री. उदय खोत (इ‍ऋ-), श्री. विकास केमदेव (च-) आणि श्री. अद्वेत केवले (इ.डल. एर्पीळीप-ाशपींरश्र डलळशपलश) यांनी संयुक्तपणे केले. त्यांच्या परीक्षणानंतर स्पर्धेचा अधिकृत निकाल जाहीर करण्यात आला.

या कार्यक्रमात आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या हस्ते खालील विजेत्यांना सन्मानित करण्यात आले.

प्रथम क्रमांक :शंतनु पाटील - छायाचित्र फोटो, प्रमाणपत्र व रु. ११,०००/- रोख

द्वितीय क्रमांक : भूषण अळसपुरे - छायाचित्र फोटो, प्रमाणपत्र व रु. ७,०००/- रोख

तृतीय क्रमांक : संदीप चौधरी - छायाचित्र फोटो, प्रमाणपत्र व रु. ५,०००/- रोख

तसेच प्रोत्साहनपर बक्षिसे म्हणून :

सुशांत पांडे - छायाचित्र फोटो, प्रमाणपत्र व रु. ३,०००/- रोख

मनीष मु-हेकर - छायाचित्र फोटो, प्रमाणपत्र व रु. २,०००/- रोख

या स्पर्धेला शहरातील छायाचित्रकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, प्रतिभावंत छायाचित्रकारांना प्रोत्साहन देण्यासाठी महानगरपालिकेचा उपक्रम यशस्वी ठरला. कार्यक्रमास महानगरपालिकेचे अधिकारी, स्पर्धक तसेच नागरिक उपस्थित होते.

या समारंभात अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त नरेंद्र वानखडे, मुख्यलेखापरिक्षक श्यामसुंदर देव, मुख्यलेखाधिकारी दत्तात्रय फिस्के, सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, मार्वे, भुषण खडेकार, गणेश काकडे, शिवा फुटाणे, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## संघटनात्मक बळकटीसाठी

# सोनाली भोयर यांचा संवाद दौरा

### विभागातील विविध शाळांना भेटी ; शिक्षण क्षेत्र व शिक्षकांच्या जाणून घेतल्या समस्या



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती-** शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष चंद्रशेखर भोयर यांच्या मार्गदर्शनाखाली संघटनात्मक बळकटीसाठी सौ सोनाली चंद्रशेखर भोयर यांनी अमरावती विभागातील विविध शाळांचा संवाद दौरा सुरू केला आहे. या दौऱ्यात त्या शिक्षकांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या शैक्षणिक तसेच वैयक्तिक अडचणी जाणून घेत आहेत.सोनाली भोयर यांनी शिक्षकांशी संवाद साधताना शैक्षणिक गुणवत्तावाढ, प्रशासकीय अडचणी, बदल प्रक्रिया, पदोन्नती, तसेच संघटनेशी संबंधित विविध विषयांवर चर्चा केली. शिक्षक महासंघाचे कार्य अधिक सक्षम आणि प्रभावी करण्यासाठी त्यांचे सूचना आणि अपेक्षा जाणून घेतल्या जात आहेत.या संवादातून शिक्षकांमध्ये सकारात्मकता आणि एकात्मतेची भावना निर्माण होत असून संघटनेला नवचैतन्य मिळत आहे. सोनाली भोयर यांच्या या उपक्रमाला शिक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून अनेक शिक्षकांनी या संवाद सत्रांद्वारे आपली मते मांडली.

# कर आकारणीतील सुधारणा : क्रीडाई अमरावतीतर्फे आयुक्त सौ. सौम्या शर्मा चांडक यांचा सत्कार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

महानगरपालिकेने कर अपेक्षित भाडे दरानुसार आकारणीमध्ये सुधारणा करत, क्षेत्रफळावर आधारित कर आकारणी लागू करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे स्वागत करत क्रीडाई अमरावतीतर्फे माननीय आयुक्त सौ. सौम्या शर्मा चांडक यांचा पुष्पगुच्छ व पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला.या प्रसंगी क्रीडाई अमरावतीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी अध्यक्ष शैलेश वानखडे, अध्यक्ष राजन पाटील, सचिव श्रीकांत धर्माळे, तसेच राम महाजन, निलेश ठाकरे, पंकज देशमुख, भूषण देशपांडे, दिलीप भाई पोपट, अनिल विखे, कपिल आंडे, रवींद्र गोरटे, सचिन वानखडे, नितीन शेंद्रे, पप्पी ढवळे, पापा चंदेले, ज्ञानेश्वर हिवसे, मंगेश हजारे, दीपक गोडवाणी, मधुर लड्डा, रवी महल्ले, आशिष दुधे, सुदीप पेठे आदी सदस्य उपस्थित होते.कर आकारणीमध्ये पारदर्शकता वाढविणारे आणि नागरिकहिताचे हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मत क्रीडाईच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले. महानगरपालिकेच्या या निर्णयामुळे कर व्यवस्थापन अधिक सुटसुटीत व न्याय होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.-

# सावरखेड ततारपुरातील गोपाल खोरगडे यांचा शेकडो कार्यकर्त्यांसह YSP मध्ये प्रवेश

### आ. रवि राणा यांच्या उपस्थितीत उत्साहात सोहळा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती-**

सावरखेड ततारपुर येथील उ.बा.ठा शाखा प्रमुख गोपाल विलासराव खोरगडे यांनी शेकडो उ.बा.ठा कार्यकर्त्यांसह युवा स्वाभिमान पार्टीमध्ये (धडझ) आज जाहीर प्रवेश केला. आमदार रवि राणा यांच्या उपस्थितीत झालेल्या या प्रवेश सोहळ्याला परिसरातून मोठा प्रतिसाद मिळाला. ढोल-ताशांच्या नादात, घोषणाबाजीच्या गजरात खोरगडे व त्यांच्या समर्थकांचे धडझ मध्ये स्वागत करण्यात आले.आ. रवि राणा यांनी गोपाल खोरगडे यांना धडझ चा दुपट्टा परिधान करून आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानपूर्वक पक्षात दाखल केले. कार्यकर्त्यांच्या उपस्थितीने व उत्साहाने कार्यक्रमाचे वातावरण भारावून गेले होते.या प्रसंगी बोलताना गोपाल खोरगडे म्हणाले, आ. रवि राणा हे कार्यकर्त्यांचा सन्मान करणारे, त्यांच्या अडचणी समजून घेऊन न्याय देणारे लोकनेते आहेत. त्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून मी व माझे सहकारी धडझ मध्ये प्रवेश करत आहोत.यावेळी आ. रवि राणा म्हणाले, युवक आणि कार्यकर्त्यांच्या बळावरच बदल घडतो. खोरगडे यांच्या रूपाने धडझ ला संघर्षशील कार्यकर्ता मिळत आहे. त्यांच्या येण्याने संघटना आणखी मजबूत होईल.सोहळ्याला सावरखेड ततारपुर व परिसरातील शेकडो कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती. प्रवेशानंतर कार्यकर्त्यांनी धडझ च्या धोरणांवर काम करण्याचा आणि संघटना अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला.या कार्यक्रमाला धडझ मार्गदर्शक सुनिल राणा, सरपंच प्रविण तायडे, उपसरपंच राहुल खोरगडे, गौतम खंडारे, मंगेश इंगोले, पुरुषोत्तम खर्चान, श्रीकृष्ण बैलमारे, अतुल डाहे, नितेश डाहे, विवेक नांदणे, दर्शन कळसकर, मुकुंद खोरगडे, मोहन तंतरपाळे, माधव धोटे, प्रतापसिंग परिहार, बाबुराव तायडे, ज्ञानेश्वर खोरगडे, जनार्दन तायडे, अनिल गोमासे, अंकुश गोमासे, योगेश डाहे, आकाश डाहे, चेतन गुडदे, दिनेश तंतरपाळे यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# दर्यापूर नगर पालिकेसाठी भाजप-राष्ट्रवादीची युती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५दर्यापूर-**

नगरपालिका निवडणुकीचा बिगुल वाजला असून स्थानिक पातळीवर भाजपने राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटासोबत युतीची घोषणा केली आहे. यामुळे विरोधकांच्या भुवया उंचावल्या आहेत. शुक्रवारी स्थानिक ढोकणे भवन येथे पत्रकार परिषदेत युतीची घोषणा केली आहे.


भाजप व राष्ट्रवादीच्या युतीमध्ये नगराध्यक्ष पदाचा उमेदवार हा भाजपकडे राहणार असल्याचे अधिकृतपणे सांगण्यात आले. २५ नगरसेवकांच्या जागा वाटपाबाबत वरिष्ठ स्तरावरील बोलणीनंतर ठरवण्यात येणार आहेत. युतीचा फॉर्म्युला कसा असेल याबाबत स्पष्टता देण्यात आली नसली तरीही ७० - ३० असा फॉर्म्युला राहणार असल्याचे सूत्रांकडून समजते. दर्यापूर नगरपालिका निवडणुकीत काँग्रेस स्वबळावर निवडणूक लढवणार असून, भाजपही स्वबळावरच निवडणूक लढवेल, असे अगोदर सांगण्यात आले होते. मात्र वरिष्ठांकडून आलेल्या सूचनेनुसार दर्यापुरात भाजप व राकाँ (अजित पवार गटाने) युती करत महायुतीची घोषणा केली आहे. शिवसेना (शिंदे गट) ही या युतीमध्ये सामील होणार का, याबाबत दोन्ही पक्षांनी तूर्तास मौन बाळगले आहे. राष्ट्रवादीचे जुन्या दर्यापुरात बऱ्यापैकी प्राबल्य आहे. याचा फायदा भाजपला होऊ शकतो.

पत्रकार परिषदेला भाजपचे बाबाराव बरवट, मदन बायस्कर मेघा भारती, अनिल कुंडलवार, भरत शुक्ला, विजय मेंढे, माणिक मानकर, रोशन कटचारमल, दीपक पारोदे, तुषार कडू तर राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील मोपारी, अमोल गहरवार यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.-

# BBNG च्या विशेष व्हर्च्युअल मीटिंगमध्ये अभिनेत्री मधुरा वेलणकर; उद्योजकांसाठी प्रेरणादायी सत्र

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१५अमरावती -**

आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत ब्राह्मण बिझनेस नेटवर्क ग्लोबल च्या व्हर्च्युअल चॅप्टर व वूमन्स विंगतर्फे आयोजित विशेष ऑनलाइन मीटिंगमध्ये सुप्रसिद्ध अभिनेत्री मधुरा वेलणकर या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. उद्योजकांना मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि प्रभावी नेटवर्किंगचे व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या या अनोख्या सत्राबाबत अमरावतीसह राज्यभरातील सदस्यांमध्ये उत्सुकता आहे.अभिनेत्री मधुरा वेलणकर या अभिनयासोबतच उद्यमशीलतेसाठीही ओळखल्या जातात. या विशेष सत्रात त्या करिअरमधील प्रेरणादायी प्रवास, आयुष्यातील महत्त्वाचे अनुभव, तसेच व्यवसायात यश मिळवण्यासाठी उपयोगी ठरतील अशा विशेष टिप्स आणि मार्गदर्शन सहभागी सदस्यांना देणार आहेत. तरुण उद्योजकांसाठी हे सत्र प्रेरणादायी ठरणार आहे.याच कार्यक्रमात उच- सुखदा भालेराव यांचेही बिझनेस प्रेझेंटेशन होणार असून, व्यवसाय विस्तार, आर्थिक नियोजन आणि प्रेझेंटेशन स्किल्स यांसारख्या विषयांवर त्या महत्त्वपूर्ण माहिती देतील.BBNG चे संस्थापक अध्यक्ष श्रीपाद कुलकर्णी, वरिष्ठ पदाधिकारी अरविंद कोर्हाळकर व महेश देशपांडे यांचीही या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती राहणार आहे. देश-विदेशातील ब्राह्मण उद्योजकांना एकत्र आणून व्यवसायवृद्धीसाठी सक्षम नेटवर्क उभे



करण्याचे ध्येय इइछ‍ऋ मार्फत साध्य केले जात आहे.या कार्यक्रमाचे आयोजन नितीन बेळे, अमित मानवी, श्रेया कुलकर्णी, अपर्णा कंठे आणि गीता आचार्य यांनी केले असून, अधिकाधिक उद्योजकांनी या विशेष सत्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.इइछ‍ऋ ची ही विशेष झूम मीटिंग उद्या १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत आयोजित करण्यात आली आहे.उद्योजकांनी सहभागी होण्यासाठी मीटिंग लिंक व अधिक माहितीसाठी ९८५०८ २२१३८ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले

# अमरावती एक्सप्रेसमध्ये घाबरलेला मुलगा आढळला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५नागपूर-** अमरावती एक्सप्रेसमध्ये १२ ते १३ वर्षांचा एक मुलगा एकटाच आणि घाबरलेल्या अवस्थेत आढळला. नागपूरकडून येत असताना प्रवाशांनी त्याच्या असामान्य शांततेकडे लक्ष दिले. मुलगा सतत खिडकीबाहेर पाहत असल्याने आणि कोणी विचारले तरी उत्तर देत नसल्याने काही प्रवाशांनी त्याच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. त्याने आपले नाव सांगितले मात्र घराचा पत्ता, आई-वडिलांची माहिती किंवा तो कुठून आला याबाबत काहीही स्पष्ट करू शकला नाही.परिस्थिती गंभीर वाटल्याने प्रवाशांनी तत्काळ टीटीईला माहिती दिली. नागपूर रेल्वे स्थानकावर सुरक्षा पथकाने मुलाला ताब्यात घेतले आणि बालकल्याण समितीशी संपर्क साधला. ही घटना १३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी घडली.सकाळी सुमारे ७ वाजताच्या सुमारास



जबलपूर-अमरावती एक्सप्रेस (गाडी क्र. १२१६०) मधील सामान्य डब्यात प्रवास करणाऱ्या एका कुटुंबाला एक सुमारे १२-१३ वर्षांचा मुलगा एकटा, घाबरलेला अवस्थेत बसलेला दिसला. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन त्या कुटुंबाने त्याच्याशी संवाद साधला आणि त्याला सुरक्षितपणे नागपूर रेल्वे स्थानकावर उतरवून प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर आणले. तत्काळ त्यांनी ही माहिती तेथे कर्तव्यावर असलेल्या प्रधान आरक्षक मानसिंग उइके यांना दिली. आरक्षक उइके यांनी मुलाला सुरक्षिततेने आरपीएफ पोस्ट, नागपूर येथे नेले आणि पुढील कार्यवाहीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवले. उपनिरीक्षक व्ही. पी. सिंह यांनी मुलाशी अतिशय संवेदनशीलतेने संवाद साधून त्याची प्राथमिक चौकशी केली. चौकशीत मुलाने सांगितले की तो १२ नोव्हेंबर रोजी जबलपूर येथील घरातून कोणालाही न सांगता बाहेर पडला होता.आपल्या चुलत भावाकडे जाण्याच्या उद्देशाने तो गाडीमध्ये बसला; मात्र प्रवासादरम्यान झोप लागल्याने तो नियोजित स्थानक चुकवून थेट नागपूरला पोहोचला. त्याने गोंधळलेल्या अवस्थेत आपली चूक कबूल केली तसेच घरी परतण्याची इच्छा व्यक्त केली.मुलाच्या मानसिक आणि भावनिक सुरक्षिततेस प्राधान्य देत आरपीएफने चाईल्डलाईन नागपूरशी तातडीने संपर्क साधला. त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत संयुक्त समुपदेशन करण्यात आले, ज्यामध्ये मुलाची स्थिती, पार्श्वभूमी आणि त्याचे हित लक्षात घेऊन योग्य ती पुढील पावले निश्चित करण्यात आली.

# काँग्रेस-राष्ट्रवादीचे अखेर सूत जुळले, ३-२-१ असे होणार वाटप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५वर्धा-** पालिका निवडणुका जवळ येताच राजकीय घडामोडी वेग घेऊ लागल्या आहेत. युती, आघाडी करायची की नाही यावर खल होत आहे. सर्व ते बळ असलेला भाजप स्वबळावर लढण्याची उर्मी ठेवून आहे. मित्र पक्ष भाजपच्या खिजगिणतीत नसल्याच्या हालचाली सूरू झाल्यात. पण काँग्रेस मात्र सगळ्यांना घेऊन चला, भाजपचा पराभव हे टार्गेट ठेवा, असे आवाहन करीत वाटाघाटी करीत असल्याचे ताजे चित्र आहे. जिल्हा काँग्रेस समिती व राष्ट्रवादी शरद पवार यांच्यात आज सायंकाळी चर्चेची पहिली फेरी आटोपली. त्यात जिल्ह्यातील सहा पालिकांचे नगराध्यक्ष पदाचे वाटप निश्चित झाले आहे. त्यानुसार तीन काँग्रेस, दोन राष्ट्रवादी व एका ठिकाणी या दोघात मैत्रीपूर्वक लढत देण्याचे ठरले. वर्धा, देवळी व पुलगाव काँग्रेसकडे, हिंगणघाट व आर्वी राष्ट्रवादी काँग्रेस व सिंदीत मैत्रीपूर्वक लढत, असा फॉर्मुला पक्का झाला. पण खरी गोम पुढेच आहे. नगराध्यक्ष पदाचा फॉर्मुला निश्चित करतांना प्रभागनिहाय वाटप अडचणीचे ठरत आहे. ८०



टक्के प्रभाग वाटून झाले. पण उर्वरित २० टक्के प्रभाग चांगलेच वाद निर्माण करणारे ठरत आहे. काँग्रेस जर हे प्रभाग राष्ट्रवादी साठी सोडणार असेल तर आमची निष्ठा मातीत घालणार कां, असा सवाल या प्रभागातील ईच्छुक काँग्रेस नेते विचारत आहे. प्रभाग सोडणार असाल तर आमचा पक्षास रामराम म्हटल्या जात असल्याने त्याची दखल काँग्रेस नेते घेत आहे. विशिष्ट प्रभाग दिले नाही नाही तर नगराध्यक्षपद अडचणीत येणार, हे काँग्रेस ओळखून आहे. राष्ट्रवादी शरद पवार काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले म्हणतात की नगराध्यक्ष पदाबाबत काही ताळमेळ झाला आहे. आज रात्री आम्ही परत चर्चा करणार आहोत. मार्ग निघेल. कारण आमचे उद्दिष्ट निश्चित आहे. भाजपचा पराभव करण्याचे आमचे टार्गेट आहे. त्यामुळे समन्वय होईल, असा विश्वास वांदिले व्यक्त करतात.राष्ट्रवादी, काँग्रेस व ठाकरे सेना हे मित्र पक्ष आहेत. यात आजच्या घडीला दोन एकत्र असून ठाकरे सेना वेगळी पडली आहे. ठाकरे सेना थेट हिंगणघाट नगराध्यक्ष पदावर दावा ठोकत आहे. या हिंगणघाट मतदारसंघात उमेदवार राहलेले अतुल वांदिले हे आता राष्ट्रवादी शरद पवार काँग्रेसीचे अध्यक्ष आहेत . त्यांच्याच मतदारसंघातील पालिका अध्यक्षपदावर ठाकरे सेना हक्क सांगत आहे. ही बाब अशक्य म्हणून या सेनेस बाजूला सारून काँग्रेस व राष्ट्रवादी दोघेच मिळून पालिका निवडणूक लढणार हे आता अटळ. त्यातच अद्याप राष्ट्रवादीतील सहकार गट बाकीच आहे.

# उधना-ब्रम्हपूर अमृत भारत एक्स्प्रेस आता आठवड्यातून तीन दिवस

**विदर्भ प्रजसत्ताक**

**दि.१५अमरावती :-** पश्चिम रेल्वेने प्रवाशांच्या सोयीसाठी गुजरातमधील उधना ते ओडिशातील ब्रम्हपूर दरम्यान सुरू केलेली साप्ताहिक अमृत भारत एक्स्प्रेस आता आठवड्यातून तीन दिवस धावणार असल्याने विदर्भातील प्रवाशांना चांगली सुविधा प्राप्त होणार आहे. या प्रस्तावाला रेल्वे बोर्डाने मंजुरी दिली आहे.



१९०२१ उधना-ब्रम्हपूर अमृत भारत एक्स्प्रेस आता दर रविवार, बुधवारी आणि शुक्रवारी धावणार आहे. या दिवशी उधना रेल्वे स्थानकावरून सकाळी ७.१० वाजता सुटेल आणि भुसावळ रेल्वे स्थानकावर दुपारी १.०० वाजता पोहचले. अकोला दुपारी ३.२५, बडनेरा ४.४८, वर्धा ५.४८, नागपूर सायंकाळी ७.३५ आणि गोंदिया रेल्वे स्थानकावर रात्री ९.४० वाजता पोहचेल.

१९०२२ ब्रम्हपूर-उधना अमृत भारत एक्स्प्रेस ही ब्रम्हपूरहून सोमवार, बुधवार आणि शुक्रवारी रात्री ११.४५ वाजता सुटणार आहे. दुसऱ्या दिवशी ती गोंदिया येथे सायंकाळी ५.५५, नागपूर ७.५५, वर्धा येथे रात्री ८.५८, बडनेरा १०.१०, अकोला ११.०७ वाजता पोहचणार आहे. ही गाडी आधी उधना येथून दर रविवारी तर ब्रम्हपूर येथून दर सोमवारी सुटत होती. आता आठवड्यातून तीन दिवस ही सुविधा उपलब्ध होणार आहे.

ही गाडी सुरत येथे नियमितपणे व्यवसाय आणि इतर कामांसाठी जाणाऱ्या विदर्भातील प्रवाशांसाठी, कामगारांसाठी विशेषतः फायदेशीर ठरेल. विदर्भातून ओडिशा राज्यात जाणाऱ्या प्रवाशांना देखील या गाडीने चांगली सुविधा उपलब्ध झाली आहे. त्यांना सुरक्षित, जलद आणि अधिक आरामदायी प्रवासाची सुविधा उपलब्ध होईल.

# चिखलदऱ्यात भाजपची मोठी झेप; राजेंद्र सोमवंशींसह १५ नगरसेवकांचा प्रवेश, अजित पवार गटाला जोरदार धक्का

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील चिखलदऱ्यात भाजपने मोठा राजकीय डाव साधत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि काँग्रेसला धक्का दिला आहे. चिखलदरा नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष व तीन वेळा नगराध्यक्षपद भूषविलेले राजेंद्र सिंग सोमवंशी यांनी त्यांच्या १५ नगरसेवकांसह भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. अमरावतीच्या भाजप नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा यांच्या गंगा सावित्री निवासस्थानी हा प्रवेश सोहळा पार पडला. यावेळी युवा स्वाभिमान पार्टीचे आमदार रवी राणा यांनीही सर्वांचे स्वागत करून राजकीय समीकरणे बदलवणारी ही मोठी घटना असल्याचे सांगितले.



नगर परिषद आणि नगर पंचायत निवडणुका तोंडावर असताना हा प्रवेश झाल्याने अमरावती येथील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)ला मोठा धक्का बसला आहे. विशेष म्हणजे, अमरावतीमध्ये राष्ट्रवादीच्या नेतृत्वात विधान परिषदेचे आमदार संजय खोडके यांचे वर्चस्व मानले जाते. त्यामुळे हा प्रवेश म्हणजे खोडके दाम्पत्याला थेट राजकीय झटका, अशी चर्चा जिल्ह्यात रंगली आहे.

या प्रवेशापूर्वी आमदार रवी राणा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि निवडणूक प्रभारी संजय कुटे यांच्याशी चर्चा करून खास रणनीती आखल्याचे बोलले जात आहे. या 'चाणक्यनीती'मुळेच हा मोठा राजकीय डाव यशस्वी झाल्याची कुजबुज राजकीय वर्तुळात सुरू आहे.राजेंद्र सिंग सोमवंशी यांचे चिखलदरा परिसरात मोठे जनाधार असून, त्यांच्या पत्नी विजया सोमवंशी या देखील नगराध्यक्षा राहिल्या आहेत. त्यामुळे सोमवंशी कुटुंबाचा भाजपमध्ये प्रवेश म्हणजे मोठा मतदारगट भाजपच्या बाजूने वळणार, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.नवनीत राणा म्हणाल्या की, सोमवंशी आणि नगरसेवकांच्या प्रवेशामुळे चिखलदऱ्यासह संपूर्ण अमरावती जिल्ह्यात भाजप अधिक बळकट झाला असून, आगामी नगर परिषद आणि नगर पंचायत निवडणुकांमध्ये भाजपाचा एकतर्फी विजय निश्चित असल्याचा त्यांना विश्वास आहे. चिखलदऱ्याच्या विकासासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून मोठा निधी आणण्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला.या कार्यक्रमाला आल्हादजी कलोती, राजेंद्र मांगलेकर, अन्वर हुसेन, वेदांत सूरपाटणे, गुरु ठाकूर सोमवंशी, तिलक मिश्रा, जितू पचोरी, अमोल हाते, विनोद गूहे, राधा कुरील आदी मान्यवर उपस्थित होते.

# अविष्कार २०२५-२६ स्पर्धेत पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसी विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

अविष्कार २०२५-२६ जिल्हा स्तरीय संशोधन स्पर्धा अमरावती येथील श्री शिवाजी सायन्स कॉलेज, अमरावती येथे उत्साहात पार पडली. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे आयोजित या संमेलनात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड विकसित व्हावी, नाविन्यपूर्ण प्रकल्पांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे आणि सृजनशक्तीला चालना मिळावी यासाठी आयोजित अविष्कार २०२५-२६ संशोधन स्पर्धेत पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश नोंदविले. विविध विभागांतील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या संशोधन प्रकल्पांना परीक्षकांकडून विशेष प्रशंसा लाभली.स्पर्धेत मानव्य, भाषा व ललित कला - पदवी स्तर विभागात विशाल ल. राठोड आणि कु. वेदांती कि. भुसकडे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. तर कु. सायली सु. सूर्यवंशी आणि कु. वैदेही सं. डोलस यांनी तृतीय क्रमांक मिळवित महाविद्यालयाचा गौरव वाढविला.मेडिसिन आणि फार्मसी - पदवी स्तर विभागात प्रथमेश दा. एकोठखाने व पवन वा. शेंडे यांनी तृतीय क्रमांक मिळविला. याचबरोबर पदव्युत्तर - मेडिसिन आणि फार्मसी विभागातीलकु . अंकिता घ. गुल्हाणे आणि कु. श्रेय प्र. बोरखडे यांनी द्वितीय क्रमांक पटकावत उल्लेखनीय कामगिरी नोंदविली.या यशामागे महाविद्यालयाचा सातत्यपूर्ण विद्यार्थी-केंद्रित दृष्टीकोन, संशोधन संस्कृतीला मिळालेली प्रोत्साहनात्मक दिशा आणि संस्थेच्या आर एन डी विभागाचे लक्षवेधी योगदान आहे. महाविद्यालयाचे आर एन डी डीन डॉ. भूषण भोयर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, प्रोत्साहन व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देत या स्पर्धेसाठी विशेष परिश्रम घेतले. तसेच, प्राचार्या डॉ. दिप्ती रूईकर यांचे सततचे प्रोत्साहन व दूरदृष्टीपूर्ण शैक्षणिक नेतृत्व यामुळे विद्यार्थ्यांना संशोधनासाठी अनुकूल वातावरण मिळाले. अविष्कार स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना घडविण्यात सर्व मार्गदर्शक प्राध्यापकांचे मौल्यवान मार्गदर्शन, सहकार्य आणि प्रोत्साहनही महत्वपूर्ण ठरले. त्यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांना संशोधन प्रक्रियेची सखोल समज मिळून गुणवत्तापूर्ण प्रकल्प सादर करता आले. महाविद्यालय प्रशासनाने सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत, या यशामुळे संशोधन क्षेत्रात नवे ध्येय ठेवण्याचे आवाहन केले आहे.



# डिजिटल जीवन प्रमाणपत्र अनिवार्य; नोव्हेंबरमध्ये सादर न केल्यास पेन्शन रोखण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

केंद्र सरकारच्या सर्व पेन्शनधारकांसाठी १ ते ३० नोव्हेंबरदरम्यान 'डिजिटल जीवन प्रमाणपत्र' मोहीम राबविण्यात येत आहे. पेन्शन चालू ठेवण्यासाठी वार्षिक जीवन प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असून, हे प्रमाणपत्र न दिल्यास पुढील महिन्यापासून पेन्शन रोखली जाऊ शकते.

पूर्वी जीवन प्रमाणपत्रासाठी प्रत्यक्ष बँकेत जावे लागत असे. मात्र आता पेन्शनधारकांना घरबसल्या मोबाइल, टॅबलेट किंवा लॅपटॉपवरून प्रमाणपत्र सादर करता येते. केंद्र सरकारच्या अधिकृत पमधून किंवा फेस पच्या माध्यमातून डिजिटल जीवन प्रमाणपत्र सहज तयार करता येते. इंटरनेट कनेक्शन आणि आधार क्रमांक असला की प्रक्रिया काही मिनिटांत पूर्ण होते. डिजिटल प्रणालीमुळे ज्येष्ठ नागरिकांचा त्रास व वेळेची बचत झाली आहे.




**प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रे**

आधार क्रमांक, पेन्शन पेमेंट ऑर्डर क्रमांक, बँक खाते क्रमांक, मोबाइल क्रमांक, ई-मेल आयडी (ऐच्छिक) पेन्शनधारकांनी आपल्या पेन्शनमध्ये अडथळा येऊ नये म्हणून नोव्हेंबर महिन्यातच डिजिटल जीवन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**सरकारी पेन्शनर्सना बँकेत जावे लागणार आहे**

राज्य सरकारच्य पेन्शनधारकांना मात्र, प्रत्यक्ष बँकेत किंवा संबंधित कोषागार कार्यालयात जाऊन जीवन प्रमाणपत्र सादर करावे लागते. राज्यपातळीवरील डिजिटल प्रणाली अद्याप सर्वत्र कार्यान्वित झालेली नाही. त्यामुळे बँकेत जावे लागणार आहे.

**असे करायचे व्हेरिफिकेशन**

आपल्या मोबाइलवर जीवन प्रमाणपत्र ॲप डाऊनलोड करा, आधार क्रमांक आणि मोबाइल नंबर नोंदवा, 'ओटीपी'द्वारे लॉगिन करा, चेहरा स्कॅन करून ओळख पटवा, प्रमाणपत्र तयार होऊन बँकेकडे पाठवले जाईल, डाऊनलोड केलेले प्रमाणपत्र ई-मेल किंवा पीडीएफ स्वरूपात जतन करा.



# सुरवाडी ग्रामपंचायतीत महिलांसाठी आरोग्य शिबिर

## शेकडो महिलांनी घेतला लाभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५सुरवाडी**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत सुरवाडी ग्रामपंचायत येथे दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ रोजी (शुक्रवार) महिलांसाठी विशेष आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले. सुरवाडी बु. आणि सुरवाडी खुर्द येथील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध आरोग्य तपासण्यांचा लाभ घेतला.

शिबिरात उइउ (क्इ) तपासणी, फॉलिक ॲसिड टॅबलेटचे वितरण तसेच प्राथमिक आरोग्य तपासणी करण्यात आली. महिलांच्या आरोग्यविषयक जागरूकतेसाठी हे शिबिर उपयुक्त ठरले.

या शिबिराचे आयोजन ग्रामपंचायत सुरवाडी खुर्द यांच्या वतीने करण्यात आले होते. सर्पंच सौ. ललिता प्रमोद बोराळकर यांच्या पुढाकाराने हे शिबिर यशस्वीपणे पार पडले. प्राथमिक आरोग्य केंद्र तळेगाव ठाकूर येथील वैद्यकीय पथकाने तपासण्या आणि मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला उपसरपंच योगेश भोंबे, सदस्य छायाताई ताथोडे, रवींद्र इंगळे, शितल नागपुरे, गजानन निकाळजे, आरती कोहळे, तसेच ग्रामपंचायत कर्मचारी सचिव सुरेंद्र चिकटे, नरेंद्र भोंबे, योगेश भोंबे उपस्थित होते.

महिलांच्या आरोग्य संवर्धनासाठी ग्रामपंचायतने घेतलेला हा उपक्रम स्थानिक पातळीवर कौतुकास्पद ठरला आहे.

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क करा
8605948853

# ग्रामपंचायतींचा सर्वांगीण विकास हाच उद्देश - संचिता मोहपात्रा

## तालुक्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा पाहणी दौरा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १५ अंजनगाव सुर्जी**

गावागावांतील ग्रामपंचायती सक्षम व समृद्ध झाल्या तरच खर्या अर्थाने राज्याचा विकास साध्य होईल. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान हे ग्रामीण भागातील शासकीय सेवा बळकट करण्यासाठी आणि प्रत्येक ग्रामपंचायतीला आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्यासाठी महत्त्वाचे पाऊल आहे. त्यामुळे प्रत्येक ग्रामपंचायतीची वेबसाइट अद्ययावत करणे, योजनांची पारदर्शक अंमलबजावणी करणे आणि लोकसहभागातून कामे उभी करणे हे आपले सामूहिक ध्येय असले पाहिजे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संचिता मोहपात्रा यांनी घोडसगाव येथे पाहणी दरम्यान केले.मोहपात्रा यांनी अंजनगाव पंचायत समिती अंतर्गत घोडसगाव,कसबेगव्हाण,निभारी, भेट देऊन मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा सविस्तर आढावा घेतला तालुक्यातील घोडसगाव येथिल मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान स्वयंमुल्यांकन अहवाला नुसार पाहणी केली.तसेच कामकाजाबद्दल समाधान व्यक्त करत स्वनिधी व लोकवर्गणीच्या माध्यमातून आर्थिक सक्षम पंचायत उभारणे, स्वच्छता व जलसंवर्धनावर भर देणे, हरित व ऊर्जा-बचत उपाययोजना राबवणे, तसेच सुशासनयुक्त पंचायत घडवणे हे अभियानाचे मूळ उद्दिष्ट आहे. या कामांसाठी ग्रामपंचायत स्तरावर प्रत्येक नागरिकाला सहभागी करून घ्यावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. यावेळी घोडसगाव येथिल सरपंच प्रदीप गोमाशे ग्रामविकास अधिकारी राजेश उगले उपस्थित होते .यावेळी घोडसगाव येथील ग्रामपंचायत अधिकारी राजेश उगले सरपंच प्रदीप गोमाशे यांनी गावातील गांडूळ खत प्रकल्प,चरखा प्रकल्प व बचत गटा मार्फत महिला स्वयंपूर्ण होत आल्याबाबत माहिती तर विशेष करून भूमिगत गटारे ची पाहणी करून या उपक्रमाची मोहपात्रा यांनी प्रशंसा केली. घोडसगाव येथिल ग्रामपंचायतीच्या वेबसाईट चे उद्घाटन करुन वेबसाइटच्या माध्यमातून ग्रामपंचायत स्तरावरील सर्व शासकीय सुविधांचे डिजिटलायझेशन करण्यात आल्याने सरपंच, ग्रामविकास अधिकारी यांचे कौतुक केले यावेळी इतर ग्रामपंचायतींनीदेखील आदर्श घेत आपले ग्रामपंचायत प्रशासनाने कार्य निर्माण करावे, असेही मोहपात्रा म्हणाल्या असून सरपंच, ग्रामविकास अधिकारी,सह गावकऱ्यांचे कौतुक केले.या पाहणी दौरा वेळी अंजनगाव पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी कल्पना जायभाये विस्तार अधिकारी प्रवीण गिऱ्हे विस्तार अधिकारी रवींद्र दारसिंबे गट शिक्षणाधिकारी सुधिर खोडे व कृषी अधिकारी सह कर्मचारी उपस्थित होते.

# थकित कर भरण्यासाठी इच्छुकांची धावपळ, न. पं.चा महसूल वाढणार

## निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्यापूर्वी उमेदवारांनी कर भरणे गरजेचे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५नांदगाव खंडेश्वर**

नगर पंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारी अर्ज दाखल करण्याची तयारी जोरात सुरू आहे. उमेदवारी अर्ज भरताना संबंधित उमेदवारांचा तसेच सूचक आणि अनुमोदकांकडे कोणताही कर थकीत नसावा, ही अट असल्यामुळे नगर पंचायत कार्यालयांमध्ये कर भरण्यासाठी मोठी गर्दी होत आहे.




निवडणुकीची प्रक्रिया सुरू होताच इच्छुकांनी स्वतःकडील कर थकबाकी फेडण्यास प्राधान्य दिल्याचे दिसून येते. नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी इच्छुक उमेदवारांनी अर्ज सादर करण्यापूर्वी मागील तीन ते चार वर्षांची थकबाकीदेखील भरली असल्याने यंदा नगर पंचायतच्या महसूल वसुलीत मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. उमेदवारी प्रक्रियेत राजकीय पक्षाकडून नामांकन देताना एक सूचक लागतो, तर अपक्ष उमेदवारांना पाच सूचक आवश्यक असतात. निवडणूक नियमांनुसार हे सर्व सूचक व अनुमोदक थकबाकीदार नसावेत. यामुळे अनेक उमेदवारांनी आपल्या सूचकांच्या आणि अनुमोदकांच्या थकबाकीची रक्कम स्वतः भरल्याचे दिसून येते. त्यामुळे उमेदवारांकडून सध्या थकबाकी भरण्याची मोहीम सुरू असल्याचे चित्र आहे.

महसूल वसुली वाढल्याने कामाचा ताण वाढू नये, म्हणून संबंधित नगर पंचायतीने कर भरण्याकरिता विशेष व्यवस्था केली आहे. कर भरण्यासाठी स्वतंत्र काउंटर, वाढीव वेळ आणि ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. उमेदवार व नागरिक यांची गैरसोय होऊ नये यासाठी अतिरिक्त कर्मचारी नेमण्यात आले आहेत.

१० ते १७ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत निश्चित करण्यात आली आहे. त्याअगोदर कर निरंक असणे आवश्यक असल्याने नगर पंचायत कार्यालयांमध्ये गेल्या काही दिवसांपासून नागरिक आणि उमेदवारांकडून कर भरण्याची लगबग सुरू झालेली आहे. निवडणुकीच्या या प्रक्रियेमुळे न. पं.च्या महसुलात मोठी वाढ होईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

# कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचेगाडगे महाराज वृध्दाश्रमात वृध्द महिला-पुरुषांना वस्त्रदान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

संत गाडगे बाबा यांच्या दशसूत्रीचे कटाक्षाने पालन करीत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते गुरूवार दि. १३ नोव्हेंबर, २०२५ रोजी वलगांव येथील गाडगे महाराज वृध्दाश्रमातील वृध्द महिला-पुरुषांना ब्लँकेट वाटप करण्यात आले. यावेळी वृध्दाश्रमातील वृध्द महिला - पुरुषांच्या चेहऱ्यावर मोठा आनंद दिसून आला. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ सदैव आपल्या पाठीशी राहील, असे आश्वासन सुध्दा कुलगुरूंनी याप्रसंगी सर्व वृध्द महिला - पुरुषांना दिले. संत गाडगे बाबा यांचे ज्या ठिकाणी निर्वाण झाले, तेथे असलेल्या वृध्दाश्रमातील वृध्द महिला - पुरुषांना गाडगे बाबांच्या दशसूत्रीनुसार वस्त्रदान करावे असा मानस होता व आज तो पूर्ण करीत असतांना त्याचा अधिक आनंद होतो आहे. आयुष्याची संध्याकाळ आपण काढत असतांना अनेक प्रकारच्या आठवणी मनात घर करुन असतात, मात्र तरीही त्या पूर्ण करता येत नाही. मात्र संत गाडगे बाबा यांनी दिलेल्या दशसूत्रीनुसार थोडे का होई ना त्या पूर्ण करण्याचा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे, असे भावनिक उद्गार याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी काढले. वृध्दाश्रमाचे संचालक श्री कैलास बोरसे यांनी वृध्दाश्रमाची माहिती देतांना अनेक संस्थांकडून वृध्दाश्रमाला मदत मिळत असते. त्यातच ज्यांच्या नावाने अमरावती विद्यापीठ चालत आहे, त्या संत गाडगे बाबांच्या दशसूत्रीनुसार विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते हे वृध्दाश्रमात वस्त्रदान करीत असल्याने अधिक आनंद झाला, असे ते म्हणाले. यावेळी वृध्दाश्रमात असलेल्या सर्व वृध्द महिला व पुरुष यांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते ब्लँकेटचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, श्री प्रल्हाद खांडेकर, मीडिया सेलचे श्री अनिकेत ठाकरे, श्री राजू तायडे, श्री अर्जून गुंजकर, वृध्दाश्रमातील सर्व महिला तसेच पुरुष कर्मचारी उपस्थित होते.



# प्रत्येक रुपया आता हिशोबात! निवडणूक विभागाचे नवे दरपत्रक जाहीर

## पाण्याची बॉटल १३ रुपये, नाष्टा २० रुपये, शाकाहारी जेवण १६० रुपये

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

नगर परिषद व नगरपंचायतींच्या निवडणुकांमध्ये खर्चमर्यादा तुलनेने कमी असली, तरी उमेदवार अनेक प्रकारचे खर्च करीत असल्याने त्यांची आर्थिक मोकळीक अधिक जाणवत होती. मात्र आता निवडणूक विभागाने जाहीर केलेल्या काटेकोर दरपत्रकामुळे उमेदवारांना प्रचारात ‘हात आवरता’ घ्यावा लागणार आहे. कोणताही खर्च हा विभागाने निश्चित केलेल्या दरानुसारच दाखल करावा लागणार असल्याने उमेदवारांचे आर्थिक गणित



पूर्णपणे बदलणार आहे.

जिल्ह्यातील १० नगर परिषद व २ नगरपंचायतींसाठी ४ नोव्हेंबर रोजी निवडणूक जाहीर होताच आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी करण्यात आली. १० नोव्हेंबरपासून उमेदवारी अर्ज दाखल प्रक्रिया सुरू झाली असून, त्याच दिवसापासून उमेदवारांना निवडणूक खर्चाची नोंदणी अनिवार्य झाली आहे. अर्ज दाखल केल्यानंतर खर्च नोंदवहीत प्रत्येक खर्चाची पावतीसह नोंद करणे बंधनकारक आहे. अंतिमतः हा खर्च निवडणूक खर्च कक्षात सादर केला जातो.

दरपत्रकात पाण्याची बॉटल १३ रुपये, नाष्टा २० रुपये, शाकाहारी जेवण १६० रुपये तर सामिष भोजन २५० रुपये असा दर निश्चित करण्यात आला आहे. तसेच स्वागत गेट १२०० रुपये प्रति नग, गादी १५ रुपये, पोडीयम १०० रुपये, शामियाना १० रुपये प्रति चौरस फुट, डोम ३५ रुपये चौरस फुट, बुके २०० रुपये, स्टँड फॅन २५० ते ३०० रुपये, साऊंड सिस्टीम १५०० रुपये, बॅनर १८ रुपये फूट, झेंडे २५ रुपये, तर कापडी टोपी २५ रुपये असा खर्च नोंदवावा लागणार आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानिक बाजारभाव, भाडे व विविध सेवांच्या प्रचलित दरांचा अभ्यास करून तसेच राजकीय पक्षांशी सल्लामसलत करून हे दरपत्रक निश्चित केले आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत उमेदवारांच्या खर्चावर कडक अंकुश येणार असून प्रचारातील फुशारकीपेक्षा पारदर्शकतेला प्राधान्य मिळणार आहे.

# ध्वनिक्षेपकावर प्रचाराला वेळेची मर्यादा

## सकाळी ६ पूर्वी व रात्री १० नंतर बंदी; प्रशासनाची करडी नजर

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**



नगर परिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना विविध राजकीय पक्ष आणि उमेदवारांकडून प्रचारासाठी ध्वनिक्षेपकांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. यामुळे ध्वनीप्रदूषण वाढणे, नागरीकांच्या शांततेला बाधा पोहोचणे आणि विशेषतः वृद्ध, रुग्ण, विद्यार्थ्यांच्या दैनंदिन वातावरणात व्यत्यय निर्माण होणे असे तोटे होत असल्याने प्रशासनाने ध्वनिक्षेपक वापरावर कठोर नियम लागू केले आहेत. सकाळी ६ वाजण्यापूर्वी आणि रात्री १० वाजल्यानंतर ध्वनिक्षेपकावरून प्रचार करण्यास कडक बंदी राहणार आहे.

निवडणूक काळात उमेदवार, कार्यकर्ते व प्रचार वाहनांद्वारे होणाऱ्या ध्वनिक्षेपणामुळे ध्वनीप्रदूषणात मोठी वाढ होत असल्याचे प्रशासनाच्या लक्षात आले आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता असल्याने ठराविक वेळेचे बंधन काटेकोरपणे लागू करण्यात आले आहे. प्रचार वाहनावरील ध्वनिक्षेपकाद्वारे मोठ्या आवाजात फेरफटका मारत फिरणे देखील बंदीच्या परिघात आहे.

ध्वनिक्षेपक वापरण्यासाठी पोलिस अधिकाऱ्यांची परवानगी अनिवार्य असेल. परवानगीशिवाय ध्वनिक्षेपकाचा कोणताही वापर कायद्याच्या कक्षेत येणार असून त्यावर तात्काळ कारवाई केली जाणार आहे. परवानगी मिळाल्यानंतरही काही अटींचे पालन करणे बंधनकारक असेल. दिवसा प्रचार करणाऱ्या वाहनांनी ध्वनिक्षेपकाचा वापर फिरत्या वाहनावर करत फिरण्याऐवजी, विशिष्ट ठिकाणी थांबूनच करावा, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत. ध्वनिक्षेपकाचा आवाज सतत चालू ठेवत जागोजागी फिरणाऱ्या वाहनांना परवानगी दिली जाणार नाही.

प्रचारासाठी ध्वनिक्षेपकाचा वापर करणाऱ्या सर्व राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी घेतलेल्या परवानगीची माहिती जिल्हा दंडाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी आणि पोलिस प्रशासनाला देणे आवश्यक आहे. ही संपूर्ण प्रक्रिया निवडणूक पूर्ण होईपर्यंत अमलात राहील.

पोलीस विभागानेही या नियमांचे काटेकोर पालन करण्यासाठी विशेष पथके तयार केली आहेत. ध्वनीप्रदूषणाविषयी नागरिकांकडून तक्रारी आल्यास त्वरित कारवाई केली जाईल, असा प्रशासनाचा इशारा आहे. प्रत्येक व्यक्तीवर व्यक्तिगत दंडात्मक कारवाई करणे शक्य नसले तरी, पोलिस विभागाकडून या आदेशांची सार्वजनिक घोषणा करून जागरूकता वाढविणे आणि नियमांचे पालन सुनिश्चित करणे अपेक्षित आहे.

प्रचाराच्या उत्साहात आवाजाची मर्यादा राखणे आवश्यक असून, सर्व राजकीय पक्षांनी तसेच उमेदवारांनी हे नियम पालन करून शांततेचे व आरोग्यदायी वातावरण टिकवावे, अशी प्रशासनाकडून विनंती करण्यात आली आहे.

# धामणगावचा अद्वितीय इतिहास! अडसड पिता-पुत्राने सत्ता असूनही केला नगराध्यक्ष पदाचा त्याग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

धामणगाव रेल्वे नगरपरिषद राजकारणात अडसड कुटुंबाचे एक विशेष आणि दुर्मिळ उदाहरण आजही चर्चेत आहे. सत्ता मिळाल्यानंतर खुर्ची सोडणे हे सर्वांसाठी कठीण मानले जाते; परंतु जनसंघाचे पहिले नगराध्यक्ष दादाराव अडसड आणि भाजपकडून पहिल्यांदा नगराध्यक्ष झालेल्या अरुण अडसड या पिता-पुत्रांनी अडीच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण होताच नगराध्यक्ष पदाचा स्वेच्छेने त्याग केला होता. धामणगाव नगरपरिषदेच्या इतिहासात हे एक आदर्श आणि उल्लेखनीय पान मानले जाते.



धामणगाव नगरपालिकेचे पहिले अध्यक्ष काँग्रेसचे बालकिसन मुंधडा होते. त्यानंतर नगराध्यक्षपद काँग्रेस, जनसंघ, काँग्रेस आणि भाजप अशा वेगवेगळ्या पक्षांकडे गेले. या नगरपरिषदेला दीर्घ राजकीय इतिहास लाभलेला असून अनेक महत्त्वाच्या नोंदी इथे जतन आहेत. काँग्रेसचे सुगणचंद लुणावत नगराध्यक्ष झाल्यानंतर थेट आमदार म्हणून निवडून आले, तर शुभकरण सराफ यांनी सलग सात वर्षे नगराध्यक्षपदाची धुरा सांभाळली.

सन १९६० मध्ये जनसंघाच्या ताब्यात धामणगाव नगरपरिषद आली तेव्हा दादाराव अडसड थेट नगरसेवकांतून निवडून आलेले नगराध्यक्ष बनले. त्या काळी नगराध्यक्षांचा कार्यकाळ सात वर्षांचा होता. पण दादाराव अडसड यांनी साडेतीन वर्षांनंतरच स्वेच्छेने राजीनामा देत पुढील साडेतीन वर्षांचे पद गणपतदादा पोळ यांच्याकडे सोपवले.१९८० मध्ये भाजप सत्तेवर आल्यावर अरुण अडसड नगराध्यक्ष झाले. त्यांनीही अडीच वर्षाचे कामकाज पूर्ण होताच पद त्याग करून उर्वरित कालावधी सत्यनारायण मुंधडा यांच्याकडे सोपवला.मागील निवडणुकीत नगराध्यक्षपद महिलांसाठी राखीव असल्याने प्रतिभा अडसड यांना संधी उपलब्ध होती. वडील, मुलगा आणि सून-तीघांनाही नगराध्यक्षपदी विराजमान होण्याची संधी असताना अडसड कुटुंबाने पदाचा आग्रह न धरता उर्मिला बोरुंदिया यांना नगराध्यक्ष बनविण्यास प्राधान्य दिले.धामणगाव नगरपरिषदेत अडसड कुटुंबाने सत्ता असूनही पदाचा त्याग करून दाखवलेले उदाहरण आजच्या राजकारणात विलक्षण व आदर्शवत ठरते.

# चिंचोली गवळीकरांचा आक्रोश

## बसफेऱ्या बंद, खासगी वाहनांना दुप्पट भाडे

### सुट्ट्यांमध्येही बससेवा सुरू करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**



मोर्शी तालुक्यातील चिंचोली गवळी येथील नागरिकांना परिवहन मंडळाच्या अनियमित बससेवेमुळे प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. शैक्षणिक सत्र सुरू असताना बस गावात नियमित येतात; परंतु शाळांना सुट्टी लागली की या बसफेऱ्या पूर्णपणे बंद केल्या जातात. त्यामुळे ग्रामीण भागातील हजारो नागरिकांना रोजच्या प्रवासासाठी खासगी वाहनांचा अवलंब करावा लागतो आणि दुप्पट भाडे मोजण्याची वेळ येते.

मध्य प्रदेश सीमेलगत असलेले चिंचोली गवळी हे सात ते आठ हजारांची लोकसंख्या असलेले मोठे केंद्र आहे. दुग्धजन्य उत्पादनासाठी प्रसिद्ध असलेल्या या गावातील गवळी समाजबांधवांना दूध-दही विक्रीसाठी मोर्शीसारख्या शहरी भागात रोज जावे लागते. मात्र बससेवा बंद असल्याने त्यांना असुरक्षित आणि महागडच्या खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागते.शासनाने ज्येष्ठ नागरिकांना मोफत आणि महिलांना निम्म्या दरात प्रवाससुविधा दिल्या असल्या, तरी या सुविधा चिंचोली गावातील लोकांना मिळतच नाहीत. मोर्शीमध्ये तहसील, बँका, सरकारी योजना, न्यायालय, बाजारपेठ तसेच आरोग्यसेवा उपलब्ध असल्याने गावकऱ्यांना प्रत्येक कामासाठी शहरात जाणे अपरिहार्य ठरते. आणीबाणीच्या वेळी रुग्णवाहिका उपलब्ध नसेल तर ग्रामीण भागातील नागरिकांना प्रवासासाठी मोठी कसरत करावी लागते.

शाळा सुरू असताना चिंचोली ते मोर्शी प्रवास फक्त १० रुपयांत होत असे; परंतु सणासुदीच्या सुट्ट्यांमध्ये, उन्हाळ्यात आणि इतर सुट्टीच्या काळात बससेवा बंद राहते. आता खासगी वाहनांनी त्याच प्रवासासाठी नागरिकांना ५० ते ६० रुपये खर्च करावे लागत आहेत.ग्रामीण जनतेने सुट्ट्यांच्या काळातही बसफेऱ्या कायमस्वरूपी सुरू ठेवाव्यात, चिंचोली-मोर्शी मार्गावर किमान तीन फेऱ्या दररोज उपलब्ध कराव्यात, अशी जोरदार मागणी प्रशासनाकडे केली आहे. ग्रामीण भागातील लोकांवर अन्याय होऊ नये म्हणून ही बससेवा तात्काळ सुरू करण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# नगर परिषद निवडणुकीत ‘तिकीट फिक्स’ची चढाओढ

## अनेक इच्छुकांचा अपक्ष लढण्याचा निर्धार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

नगर परिषद निवडणुकीसाठी आरक्षण जाहीर होताच शहरातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. आरक्षणात झालेल्या बदलांमुळे अनेक इच्छुकांना स्वतःच्या प्रभागात संधी मिळणार नसल्याने ते इतर प्रभागात लढण्याची तयारी करत आहेत. कोणत्याही परिस्थितीत यंदा निवडणूक लढायचीच, असा निर्धार अनेक संभाव्य उमेदवारांनी केला आहे.

तिकीट मिळविण्यासाठी नेतेमंडळींच्या भेटीगाठींना वेग आला असून इच्छुकांकडून स्थानिक खासदार, आमदार आणि वरिष्ठ पदाधिकाऱ्यांकडे ‘मीच योग्य उमेदवार’ असल्याचे पटवून देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. काहीजणांनी तर स्वतःऐवजी आपल्या पत्नीला उमेदवारी देण्याची मागणी करत नवीन शक्कल लढविल्या आहेत. तिकीट ‘फिक्स’ करण्यासाठी गळ घालणे, मोर्चेबांधणी आणि शक्तिप्रदर्शन सुरू आहे.


दरम्यान, पक्षाकडून उमेदवारी न मिळाल्यास अपक्ष म्हणून निवडणूक लढण्याचा निर्णय अनेकांनी पक्का केला आहे. यासाठी समर्थकांची बैठका, आंतरिक तयारी आणि प्रचारयोजनांनाही वेग आला आहे. सोडतीमुळे आरक्षण बदलले असले तरी लढायचेच, असा चंग बांधल्याने निवडणुकीची चुरस आणखी वाढण्याची चिन्हे आहेत.

# निवडणुकीत बदलले चिन्हांचे समीकरण

# केळी-गाजर आऊट, भेंडी-मिरची इन

## भाजीपाल्यावर रंगणार मतांचा खेळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**



नगरपरिषद निवडणुकीत अपक्ष उमेदवारांसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या निवडणूक चिन्हांच्या यादीत यंदा मोठे बदल करण्यात आले आहेत. प्रशासनाने जाहीर केलेल्या १९४ निवडणूक चिन्हांच्या यादीतून यंदा केळी, गाजर, टरबूज आणि नारळ ही लोकप्रिय चिन्हे वगळण्यात आली आहेत. त्यांच्या जागी भेंडी, हिरवी मिरची, ढोबळी मिरची आणि फुलकोबी ही नवीन चिन्हे समाविष्ट करण्यात आली आहेत.

निवडणूक म्हणजे चिन्हांची लढत असे म्हटले जाते. विशेषतः अपक्ष उमेदवारांसाठी प्रचारात चिन्हाची ओळख ही मतदारांपर्यंत पोहोचण्याचे प्रभावी साधन असते. ग्रामीण जीवन, कृषी उत्पादन आणि दैनंदिन वापरातील वस्तूंशी संबंधित चिन्हांना मतदारांचा मोठा प्रतिसाद मिळतो. त्यामुळेच यंदा घोषित झालेल्या यादीत भाजीपाल्यासह शेतमालाशी जोडलेली अनेक चिन्हे प्रमुखता मिळवताना दिसत आहेत.

नगरपरिषद निवडणुकीसाठी १० नोव्हेंबरपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली आहे. या प्रक्रियेदरम्यान उमेदवारांना संभाव्य चिन्हांची प्राधान्यक्रमाने मागणी करणे अपेक्षित आहे. अर्जांची छाननी पूर्ण झाल्यानंतर अपक्ष उमेदवारांना क्रमवारीनुसार चिन्हांचे वाटप केले जाणार आहे.भाजीपाल्याबरोबरच फळांचीही चिन्हे मतदारांच्या पसंतीस उतरू शकतात. भेंडी, मिरची, फुलकोबी ही चिन्हे यावर्षीच्या राजकीय आखाड्यात नवा रंग भरतील. केवळ फुले किंवा पारंपरिक चिन्हेच नव्हे, तर भाज्या, शेंगा, फळे, धान्य, घरगुती वस्तू अशा अनेक प्रकारची नवीन चिन्हे मतदारांच्या समोर येण्याची शक्यता आहे.उमेदवारांची संख्या वाढल्यास चिन्हांची विविधता देखील वाढेल. त्यामुळे या निवडणुकीत मतदारांना पोस्टर, बॅनर आणि प्रचार यात्रांमध्ये भाजीपाला-फळांच्या नावांनी प्रचार करणारे उमेदवार पाहायला मिळतील. बदललेल्या चिन्हांमुळे मतदारांचे लक्ष वेधणे ही उमेदवारांसमोरची मोठी रणनीतिक लढत ठरणार आहे.यंदाची चिन्हांची यादी जाहीर झाल्याने निवडणूक वातावरणात नवीन उत्सुकता निर्माण झाली असून अपक्ष उमेदवारांसाठी चिन्हांची निवड ही निवडणूक प्रचारातील पहिली आणि महत्त्वाची पायरी ठरत आहे.

# पदवीधर, शिक्षक मतदारयादी तयारीचे सुधारीत वेळापत्रक जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**



महाराष्ट्र विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांसाठी दि. १.११.२०२५ या अर्हता दिनांकावर आधारित नवीन मतदारयादी तयार करण्याचे सुधारीत वेळापत्रक भारत निवडणूक आयोगाने जाहीर केले आहे. त्यानुसार महत्वाच्या टप्प्यांचे सुधारीत वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.मतदार नोंदणी अधिनियम, १९६० नुसार, या पुनरिक्षण कार्यक्रमाचे टप्पे आखण्यात आले आहे. त्यानुसार आता हस्तलिखिते तयार करणे आणि प्रारुप मतदार याद्यांची छपाई ही दि. २८ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत करण्यात येणार आहे. त्यानंतर ३ डिसेंबर २०२५ रोजी प्रारुप मतदार याद्यांची प्रसिध्दी करण्यात येणार आहे. या मतदार याद्यांवर ३ ते १८ डिसेंबर २०२५ या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येतील. दावे व हरकती ५ जानेवारी २०२६ रोजी निकाली काढण्यात येतील. याच दिवशी पुरवणी यादी तयार करणे आणि छपाई करण्यात येणार आहे. त्यानंतर १२ जानेवारी २०२६ रोजी मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी करण्यात येणार आहे, असे जिल्हाधिकारी कार्यालयाने कळविले आहे.

# लव्ह जिहाद प्रकरणी गावकरी आक्रमक; नांदगाव पेठ येथील प्रकार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५नांदगाव पेठ**

देशात लव्ह जिहादचे अनेक प्रकरणे घडत असून त्यामध्ये फूस लावून हिंदू मुली व महिलांना पळवून नेऊन त्यांचे धर्मांतरण करण्याचा प्रकार घडत समोर येत आहे.तर नांदगाव पेठ येथील एका महिलेला फूस लावून पळवून नेण्याचा प्रकार नांदगाव पेठ येथे घडला असून त्या महिलेच्या पतीने नांदगाव पेठ पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली असून त्यावर आतापर्यंत थातूर मातुर कार्यवाही झाली असून आरोपी मोकळा असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला



आहे.लव्ह जिहादच्या शिकार झालेल्या महिलेला पती,पाच वर्षाचा एक मुलगा व तीन वर्षाची एक मुलगी आहे.तर आरोपीला तात्काळ अटक करून त्या महिलेल्या परिवाराच्या स्वाधीन करण्यात यावे अशी मागणी पोलीस वरिष्ठ अधिकारी शिंदे व ठाणेदार दिनेश दहातोंडे यांच्याकडे केली आहे.यावेळी नांदगाव पेठ येथील विविध पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

नांदगाव पेठ परिसरात लव्ह जिहाद प्रकरण घडणे म्हणजे दुःखाची बाब आहे. पोलीस विभागाणे तात्काळ आरोपीला अटक करून त्या महिलेला लव्ह जिहादच्या पाशातून मुक्त करावे अन्यथा आम्ही आंदोलन उभारू अशी प्रतिक्रिया प्रा मोरेश्वर इंगळेभाजपा कार्यकर्ते यांनी दिली.



आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत